| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ६० वा | शुक्रवार दिनांक ०८ मे, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### केबल व बॅटरीची चोरी गुन्हा दाखल

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.०५.०५.२०२६ रोजी जुने कोर्ट तुळजापूर येथील लाईट फिटींगचे २००० किंमतीची केबल, व जनरेटर किर्लोस्कर साठी लावलेली १२ होल्ट ची बॅटरी ३,००० असा एकुण ५,००० किंमतीचे साहित्य आब्बास . पापनाश नगर तुळजापूर ता. तुळजापूर यांनी चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे -मेघराज तानाजी सावंत, वय ४५ वर्षेद्व व्यवसाय नोकरी (दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर तुळजापूर रा. घाटशिळ रोड दिपक चौक तुळजापूर यांनी दि.०६.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव येथून डिगीतील ३५००० रु चोरले

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी `-विठ्ठल मच्छिंद्र विधाते, वय ५६ वर्षे, रा. धारासुर देवी मंदीराचे समोर धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे रिक्षा डिक्कीत ठेवलेले रोख रक्क ३५,००० हे दि.०५.०५.२०२६ रोजी देवी मंदीराचे समोर धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने विठ्ठल विधाते यांचे रिक्षाचे डिक्कतुन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विठ्ठल विधाते यांनी दि.०६.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### डोंगराजवळ घेवुन जावुन केला लैंगिक अत्याचार

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील १४ वर्षे ५ महिने महिला दि.०७.०४.२०२६ रोजी हि एकटी असल्याचा फायदा घेवून एका गावातील एका तरुणानी तिस गावातील रोडला जाणाऱ्या रस्त्याचे एका पायवाटाने डोंगराजवळ नेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतीची आईने दि.०६.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४(१) (२) (फ) (जे) सह कलम ४, ८ पोस्को क्ट अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पाच जणांनी संगनमत करुन लग्न लावुन केला लैंगिक अत्याचार

मुरुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील १७ वर्षे १० महिने मुलगी दि.२२.०५.२०२५ ते ०१.०५.२०२६ रोजी पाच जणांनी संगणमत करुन नमुद पिडीत मुलीचे लग्न लावून देवून नमुद एका तरुणानी तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.०६.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४(२) (एम), ३(५) सह ४ पोस्को क्ट सह ९,११ बालविवाह कायदा अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## बेंबळीतील ‘धारासूरमर्दिनी’ शेतकरी उत्पादक कंपनीच्या कार्याची जागतिक बँक तज्ज्ञांकडून दखल



धाराशिव दि.७ मे (जिमाका) ग्रामीण महिलांच्या नेतृत्वातून उभ्या राहिलेल्या कृषी व्यवसायाला आता जागतिक स्तरावरही दाद मिळू लागली आहे.माननीय बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पांतर्गत स्थापन झालेल्या धाराशिव तालुक्यातील बेंबळी येथील ‘धारासूरमर्दिनी महिला शेतकरी उत्पादक कंपनी’च्या कार्याचे जागतिक बँकेच्या तज्ज्ञांनी विशेष कौतुक केले.कंपनीला दिलेल्या नुकत्याच दिलेल्या भेटीदरम्यान तज्ज्ञांनी कंपनीच्या आतापर्यंतच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत महिला सक्षमीकरणाच्या या उपक्रमाची प्रशंसा केली.

ग्रामीण महिलांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या उपक्रमाने अल्पावधीतच उल्लेखनीय प्रगती साधल्याचे निरीक्षण यावेळी नोंदविण्यात आले.जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी कंपनीच्या स्थापनेची प्रक्रिया,प्राप्त निधीचा विनियोग तसेच कंपनीमार्फत राबविण्यात येणारा शेतीमाल व्यापार (ट्रेडिंग) याची सविस्तर माहिती घेतली.कंपनीचे काम पारदर्शक आणि व्यावसायिक पद्धतीने सुरू असल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

कंपनीमार्फत आंबेवाडी येथे डाळ गिरणी, स्वच्छता,प्रतवारी आणि पॅकेजिंग प्रकल्प उभारण्यात येत आहे.सुमारे ४३.४६ लाख रुपयांच्या खर्चातून हा प्रकल्प साकारला जात असून,डच-ठढ अंतर्गत त्यासाठी २६.०८ लाख रुपयांचे अनुदान उपलब्ध होणार आहे.या प्रकल्पामुळे स्थानिक महिला शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून अधिक आर्थिक संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात आले.महिला शेतकऱ्यांनी एकत्र येऊन उभारलेले हे व्यासपीठ केवळ शेतीपूरक व्यवसायाला चालना देत नसून,ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती घडवत आहे, असे मत यावेळी तज्ज्ञांनी व्यक्त केले. या भेटीनंतर कंपनीच्या महिला सभासदांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून,भविष्यात मोठ्या प्रमाणात शेतीमाल प्रक्रिया व थेट विक्री उपक्रम राबविण्याचा मानस कंपनीने व्यक्त केला. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्रकल्प संचालक यांचे मार्गदर्शन लाभत असल्याचे सांगण्यात आले.

या भेटीदरम्यान जागतिक बँकेच्या तज्ज्ञ चारूलता शर्मा व श्रीमती.वनिता मॅडम यांच्यासह विविध विभागांतील मान्यवर उपस्थित होते.यामध्ये लातूरच्या श्रीमती संगीता शेटे (जेंडर एक्स्पर्ट व महिला सक्षमीकरण तज्ज्ञ),उमेदच्या श्रीमती वनिता डोंगरे,डीएमएम श्री.भांगे, बीएमएम,श्रीमती. गायकवाड, प्रभाग समन्वयक अमोल खवले, आत्मा विभागातील श्रीमती. कानूगडे,प्रायमूव्ह प्रतिनिधी,RIU व DIU स्मार्ट कार्यालयातील अधिकारी तसेच तालुका अभियान कक्षातील प्रतिनिधींचा समावेश होता.

## विमा कंपनीची चाल ढकल थांबणार:पुढील तारखेला ‘अंतिम’ सुनावणी - आमदार राणाजगजितसिंह पाटील

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- खरीप २०२० मधील सोयाबीनच्या पीक विम्यावरून विमा कंपनीने तांत्रिक अडथळे निर्माण करीत केलेली चाल ढकल आता थांबणार आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढील तारखेला 'अंतिम' सुनावणी घेण्याचे आदेशित केले आहे. बुधवारी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत न्यायालयाने विमा कंपनीचे सर्व तांत्रिक दावे ऐकून घेतले, उन्हाळी सुट्टी संपल्यानंतर या प्रकरणावर 'अंतिम सुनावणी' घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मागील चार वर्षांपासून लढा देणाऱ्या सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांना लवकरच दिलासा मिळणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान, विमा कंपनीने पुन्हा एकदा तांत्रिक मुद्द्यांचा आधार घेत उच्च न्यायालयात जमा असलेल्या ७५ कोटी रुपयांच्या बाबतीत तीव्र आक्षेप घेत मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांचा अवमान झाला असल्याचा कांगावा करत गोंधळ निर्माण करण्याचा आणि खटला लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, शेतकरी बांधवांच्या वतीने बाजू मांडणारे केंद्र सरकारचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. बलबीर सिंग यांनी याबाबत असलेले वास्तव मा. सर्वोच्च न्यायालयाच्या समोर आणत सुरुवातीपासून कंपनी कशी जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहे हे लक्षात घेऊन अंतिम सुनावणीला लवकरात लवकर वेळ देण्याबाबत न्यायालयाकडे आग्रह केला. हा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने उन्हाळी सुट्टीनंतर या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

**आमदार पाटील यांनी दिल्लीत विधिज्ञासोबत आखलेली रणनीती आली कामी**

खरीप २०२० आणि २०२१ च्या प्रलंबित विम्याबाबत आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिल्लीत उपस्थित राहत काल व आज केंद्र सरकारचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. बलबीर सिंग आणि ॲड. सुधांशू चौधरी,ॲड.शिंदे यांच्यासह लीगल टीम सोबत झालेल्या बैठकीत आखलेली रणनीती फळाला आली असून, विमा कंपन्यांच्या आडमुठ्या धोरणाविरोधात शेतकऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात मोठी आघाडी घेतली आहे.

**शेतकऱ्यांच्या हक्कासाठी दिल्लीपर्यंत लढा**

विमा कंपन्यांनी कितीही तांत्रिक अडथळे आणले, तरी शेतकऱ्यांच्या घामाचा पैसा मिळेपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही. उच्च न्यायालयाचा निकाल हा सत्याचा विजय असून, सर्वोच्च न्यायालयातही शेतकऱ्यांचाच विजय होईल. ठाकरे सरकारच्या काळात या प्रश्नाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले, मात्र आपण हार मानली नाही.

शेतकरी बांधवांच्या मदतीने कनिष्ठ न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत हा लढा नेला. आता विमा कंपनीची कोणतीही युक्ती चालणार नाही. उन्हाळी सुट्टीनंतर होणारी अंतिम सुनावणी शेतकऱ्यांसाठी सुगीचे दिवस घेऊन येईल असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## समाधान समारोह-२०२६ : सर्वोच्च न्यायालयाचा पुढाकार ; घराघरात न्याय मिळवण्याची सुवर्णसंधी

धाराशिव` (जिमाका) वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये अडकलेल्या नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली असून भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पुढाकारातून ‘समाधान समारोह-२०२६’ या विशेष मोहिमेची घोषणा करण्यात आली आहे.या उपक्रमांतर्गत २१,२२ व २३ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथील उच्च न्यायालयात विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

‘सहभागी न्याय’ आणि ‘घराघरात न्याय’ हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे सामोपचाराने आणि जलद गतीने सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.त्यामुळे न्यायप्रक्रियेला गती मिळून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

जिल्ह्यातील ज्या पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत,त्यांच्यासाठी ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे.आपसी तडजोडीद्वारे प्रकरणे निकाली काढण्यासाठी इच्छुकांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती.अभिश्री देव व सचिव श्रीमती.भाग्यश्री पाटील यांनी केले आहे.

या ‘समाधान समारोह-२०२६’ उपक्रमाचे अनेक फायदे आहेत. वर्षानुवर्षे चालणाऱ्या खटल्यांचा निकाल दोन्ही बाजूंच्या संमतीने काही तासांत लागू शकतो, त्यामुळे वेळेची मोठी बचत होते.तसेच लोक अदालतीमध्ये प्रकरण निकाली निघाल्यास कोर्ट फी परत मिळण्याची तरतूद असून वकिलांच्या दीर्घकालीन खर्चातूनही सुटका होते. या प्रक्रियेत हार-जीत यापेक्षा सामोपचाराने तोडगा काढण्यावर भर दिला जातो,ज्यामुळे दोन्ही पक्षांमधील संबंध सुधारण्यास मदत होते.

या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नागरिकांना घरबसल्या सहभागाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.इच्छुकांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून किंवा ऑनलाईन पद्धतीनेही या प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. यासाठी दिल्लीला जाण्याची आवश्यकता नसणार आहे.

न्याय आता केवळ न्यायालयाच्या इमारतीपुरता मर्यादित न राहता,तो नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न असल्याचे स्पष्ट होत आहे.त्यामुळे या संधीचा लाभ घेऊन प्रकरणे निकाली काढत तणावमुक्त व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

विशेष लोक अदालतीबाबत अधिक माहितीसाठी ८५९१९०३६२५ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा वश्रींरीव२५सारळश्र.लो या ई-मेलवर संपर्क साधावा.

## ९ मे रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन ; वाद मिटविण्याची सुवर्णसंधी

धाराशिव (जिमाका)- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण,सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवार, ९ मे २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.नागरिकांनी या संधीचा लाभ घेत आपले वाद सामोपचाराने निकाली काढावेत,असे आवाहन करण्यात आले आहे.

या लोकअदालतीत मोटार वाहन अपघात प्रकरणे,कौटुंबिक प्रकरणे, वीज वितरण कंपनीशी संबंधित प्रकरणे,दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी प्रकरणांचा समावेश करण्यात येणार आहे.तसेच बँका आणि वीज वितरण कंपन्यांची दाखलपूर्व प्रकरणेही लोकअदालतीत घेण्यात येणार आहेत.

याशिवाय कौटुंबिक न्यायालय आणि ग्राहक तक्रार निवारण मंचातील प्रकरणे देखील या लोकअदालतीत तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.लोकअदालतीमध्ये प्रकरण तडजोडीने मिटविल्यास संबंधित पक्षकारास भरलेली न्यायालयीन फी परत मिळण्याची तरतूद आहे.

नागरिकांनी आपापसातील वाद सामोपचाराने मिटवून वेळ,पैसा आणि मानसिक ताण-तणाव वाचवावा,तसेच राष्ट्रीय लोकअदालतीचा अधिकाधिक लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती अभिश्री देव व सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी केले आहे.

आपली प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यास इच्छुक नागरिकांनी जिल्हा न्यायालयातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,उस्मानाबाद किंवा संबंधित तालुका विधी सेवा समिती येथे संपर्क साधावा.अधिक माहितीसाठी ८५९१९०३६२५ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा वश्रींरीव२५सारळश्र.लो या ई-मेलवर संपर्क साधावा.तसेच प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यासाठी पक्षकारांनी आपल्या वकिलांशीही संपर्क साधावा.

## पूरबाधित सहा जि. प. शाळांना लाखोंचे साहित्य वितरण तालुक्यातील शाळांना सीमेन्सकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप




परंडा (प्रतिनिधी)-परंडा तालुक्यातील सहा जिल्हा परिषद शाळांना सीमेन्स वर्कर्स युनियन व सीमेन्स ऐक्य ट्रस्ट यांच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. अतिवृष्टी व पूरबाधित शाळांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. परंडा तालुक्यातील अतिवृष्टी व पूरबाधित क्षेत्रातील शाळांना मदत करण्याच्या हेतूने सीमेन्स वर्कर्स युनियन आणि सीमेन्स ऐक्य ट्रस्ट, ठाणे (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील सहा जिल्हा परिषद शाळांना लाखो रुपयांचे शालेय उपयोगी साहित्य व उपकरणांचे वाटप करण्यात आले. आवारपिंपरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आवारात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा आवारपिंपरी, वागेगव्हाण, कारंजा कपिलापुरी, देवगाव (खुर्द) व देऊळगाव आदी शाळांना गरजेनुसार मुलींसाठी शौचालये, पाईपलाईन, पाण्याची टाकी व स्टँड, शुद्ध पाण्यासाठी वॉटर फिल्टर्स, स्टील टाक्या, इलेक्ट्रिकल इन्व्हर्टर, सतरंज्या, सीलिंग फॅन्स, २० लिटरचे वॉटर थर्मास फ्लास्क तसेच प्रयोगशाळा साहित्य प्रदान करण्यात आले. यावेळी सीमेन्स ऐक्य एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्टचे अध्यक्ष अशोक राणे, विश्वस्त तथा सीमेन्स क्रेडिट सोसायटीचे सेक्रेटरी मनोज मोहिते, सीमेन्स वर्कर्स युनियनचे छत्रपती संभाजीनगर ब्रँच सेक्रेटरी दत्तू भंडे, माजी कौन्सिल मेंबर प्रकाश जाधव, सीमेन्स हौसिंग सोसायटीचे माजी चेअरमन विजय जाधव, सभापती अर्चना जाधव, शिवसेना तालुकाप्रमुख आण्णासाहेब जाधव, शालेय समिती अध्यक्ष राजकुमार नरुटे, उपाध्यक्ष धनश्री गुडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना अशोक राणे व दत्तू भंडे यांनी सांगितले की, सीमेन्स वर्कर्स युनियन व ऐक्य ट्रस्टच्या वतीने कामगारांच्या मासिक वर्गणीतून हा निधी जमा केला जातो. आजवर भारतभर आणि विशेषतः महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अशा प्रकारे विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षकवृंद व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. ट्रस्टच्या नावे आभारपत्र देऊन गौरवण्यात आले मदत मिळालेल्या सर्व सहा शाळांच्या मुख्याध्यापकांनी शहाजी घावटे (आवारपिंपरी), शिवाजी शिंदे (वागेगव्हाण), शिवाजी पंडित (कपिलापुरी), बाबासाहेब शिंदे (देवगाव खुर्द), सचिन सूर्यवंशी (देऊळगाव) व आण्णा कोळी (कारंजा) यांनी संस्थेच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सर्व मुख्याध्यापकांनी सीमेन्स वर्कर्स युनियन व ट्रस्टच्या नावे आभारपत्र देऊन गौरव केला. सीमेन्स युनियनचे जनरल सेक्रेटरी गिरीश आष्टेकर, अध्यक्ष मनोज बोडके व पदाधिकाऱ्यांचे या सामाजिक कार्याबद्दल उपस्थितांनी आभार मानले.

## उपवर्गीकरणाविरोधात धाराशिवमध्ये रणशिंग; आ. प्रवीण स्वामी यांचा इशारा, धनंजय शिंगाडे आक्रमक भूमिकेत

धाराशिव, (प्रतिनिधी) : अनुसूचित जातींमध्ये अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करून ५९ प्रवर्गांमध्ये फूट पाडण्याचा राज्य सरकारचा डाव असून, हा निर्णय समाजहिताच्या विरोधात असल्याचा घणाघाती आरोप आमदार प्रवीण स्वामी यांनी केला. या उपवर्गीकरणाला कडाडून विरोध करण्यात येणार असून, येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात ठाम भूमिका मांडली जाईल. वेळ पडल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. शहरातील शासकीय विश्रामगृहात अनुसूचित जातीतील ५९ प्रवर्गांच्या उपवर्गीकरणाविरोधात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विविध समाजघटकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार स्वामी पुढे म्हणाले की, अनुसूचित जातींच्या सर्वांगीण उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात भक्कम तरतुदी केल्या आहेत. त्या तरतुदींना कमकुवत करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. सरकार हेतुपुरस्सर समाजात दुभंग निर्माण करत असून, हा डाव उधळून लावण्यासाठी सर्वांनी एकजुटीने लढा उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

धनंजय शिंगाडे यांची ठाम भूमिका; ‘निर्णय मागे घ्या, अन्यथा राज्यभर आंदोलन’ बैठकीत संयोजक धनंजय शिंगाडे यांनी आक्रमक व स्पष्ट शब्दांत सरकारवर टीका करत उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात तीव्र भूमिका मांडली. शिंगाडे म्हणाले, उपवर्गीकरणामुळे समाजात तणाव वाढत असून, सामाजिक ऐक्य धोक्यात येत आहे. राज्यातील हजारो जातींमधील नागरिक आज अस्वस्थ आहेत. सरकार भीतीचे वातावरण निर्माण करत असून, हा निर्णय तात्काळ मागे घेतला नाही तर राज्यभर आंदोलन उभारले जाईल.

ते पुढे म्हणाले की, महार समाजासह सर्व घटकांना न्याय मिळाला पाहिजे; मात्र कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी होऊ नये, ही आमची स्पष्ट भूमिका आहे. अ, ब, क, ड उपवर्गीकरणाचा घाट हा समाजात दुभंग निर्माण करणारा असून, तो आम्हाला मान्य नाही. सरकारला थेट इशारा देत शिंगाडे यांनी सांगितले की, भीतीचे राजकारण थांबवा; अन्यथा ५९ जातींना सोबत घेऊन जिल्ह्यापासून राज्यभर व्यापक आंदोलन छेडले जाईल.

यावेळी प्रा. संजय कांबळे यांनी उपवर्गीकरणामुळे सामाजिक समतेच्या मूलभूत तत्त्वालाच धक्का बसत असल्याची भूमिका मांडली. संविधानिक आरक्षण व्यवस्थेत फूट पाडण्याचा कोणताही प्रयत्न समाजासाठी घातक ठरेल, असे ते म्हणाले.

तर राजाभाऊ ओव्हाळ यांनी ५९ प्रवर्गांनी एकसंघ राहून संघर्ष उभारण्याची गरज व्यक्त केली. समाजात कृत्रिम विभागणी निर्माण करून राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न हाणून पाडला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. बैठकीत उपस्थित मान्यवरांनी एकमुखीपणे उपवर्गीकरणाला विरोध दर्शवित, ५९ जातींच्या एकत्रित शक्तीने हा लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. लवकरच आंदोलनाची दिशा निश्चित करून धाराशिव जिल्ह्यातून राज्यव्यापी आंदोलनाची ठिणगी पेटवली जाईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. या बैठकीसाठी

ॲड. ज्योती बडेकर ॲड. इंद्रजीत शिंदे अनिल हजारे यशपाल बनसोडे अशोक बनसोडे उपस्थित होते

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## प.बंगालमध्ये पुन्हा हिंसाचार

प. बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. यावेळी विद्यमान मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा परभव झाला. प. बंगालच्या नागरिकांनी ठरवुन ममताचा परभव केला असेच दिसून येते. त्यानंतर मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नाही असे ममतांनी मत व्यक्त केले असले तरी ते कायदेशीर मत नव्हे. मुळात प. बंगालमध्ये ममता राज तीन टर्म म्हणजे पंधरावर्ष राज्य केले. त्यांनी भेदभाव केल्याचा परिणाम भोगावा लागला. सर्वात मोठा पराभव झाल्याने ते पचविणे आवघड ममताजीला होत आहे. सर्व काही व्यवस्थित होत असताना पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा येथे भाजप नेते सुवेंदु अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ यांची बुधवारी रात्री १०.३० वाजता गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. घटनेच्या वेळी रथ स्कॉर्पिओ गाडीने आपल्या घरी जात होते. गाडी ड्रायव्हर चालवत होता. गाडीत आणखी एक व्यक्ती उपस्थित होता. अहवालानुसार, हल्ल्यात ऑस्ट्रेलियन ग्लॉक पिस्तूलचा वापर करण्यात आला आहे. एकूण १० गोळ्या झाडण्यात आल्या आहेत. रथ यांच्या छातीत दोन गोळ्या लागल्या, ज्या हृदयाच्या आरपार गेल्या, एक गोळी पोटात लागली. हल्ल्यात रथ यांच्या चालकाला आणि आणखी एका व्यक्तीलाही उजव्या हाताला, पोटात आणि छातीत गोळ्या लागल्या आहेत. भाजपने टीएमसीवर रथ यांच्या हत्येचा आरोप केला आहे. टीएमसीने आरोपांचे खंडन करत या प्रकरणाच्या सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. या घटनेच्या सुमारे १ तासानंतर रात्री सुमारे १२.३० वाजता बशीरहाट जिल्ह्यात रोहित रॉय नावाच्या भाजप कार्यकर्त्यालाही गोळ्या घालण्यात आल्या. त्याची प्रकृती गंभीर आहे. राज्यात गेल्या २ दिवसांत पीए रथ यांच्या व्यतिरिक्त भाजपच्या २ आणि टीएमसीच्या कार्यकर्त्यांची हत्या झाली आहे. प. बंगालमध्ये आरजकता माजविण्याचा डाव उघड दिसून येत आहे. प. बंगालमध्ये ममता यांच्या राज्यकारभारत माफीयांची संख्या अधिक होती. त्यांचा लाड होत होता. एक तर घुसखोरी मोठ्या प्रमाणात झालेली आहे. परदेशिय मंडळींना भाजपाचे राज्य नको आहे. ममता जशा अहिंदुचा लाड करीत होत्या तसे भाजपा करणार नाही. भाजपाचे राज्य आल्यास योगी पॅटर्न राबविण्याची भिती आहे. या भितीपोटी माफीया, गुंड खवळले असणार, त्यामुळे भावी मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ यांच्यावर गोळ्या झाडल्या व त्यांना ठार मारले. वास्तविक भाजपाला प.बंगालमध्ये यश आले त्यात पीए चंद्रनाथ रथ यांचा मोठा सहभाग आहे. त्यांनी राजकिय केलेली व्युहरचना यशस्वी झाली. त्यामुळे अनेकांच्या डोळ्यात दिपत होते. प. बंगालमध्ये अजूनही आरजकता माजली आहे. ती तातडीने कमी होईल असे वाटत नाही. भाजपाचे अनेक दिग्गज टिपले जाण्याची शक्यता आहे. जे गुंडवृत्तीचे आहेत. त्यांना भाजपाची सत्ता नको आहे असे धुर्त विचाराची मंडळी हातात शस्त्र घेवुन भाजपाच्या किंबहुन हिंदु कार्यकर्त्यावर गोळ्या घालत आहे, घालणार आहेत. त्यामुळे प. बंगालमध्ये कायदा व सुव्यवस्था कडक करण्याची गरज आहे. जशासतसे उत्तर देण्याची आवश्यकता. वेळीच अतिरेक रोखला नाही तर ममताचे राज्य बरे म्हणण्याची पाळी येवू न देणे अग्निदिव्य आहे. वेळीच प. बंगालमध्ये माफीया आहेत. गुंड आहे. अहिंदुना निशाणा बनवित आहे, ठरवुन हत्त्या करीत आहेत अशांचा बंदोबस्त वेळीच करण्याची गरज आहे. भाजप नेते सुवेंदु अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ हत्त्या करण्यामागे मोठी दहशद निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येत आहे. एकतर घुसखोरी केलेले व अधिकृत कागदपत्रे तयार करून रहाणारी मंडळी अधिक आहे. मुळात प. बंगालमध्ये कायदा व सुव्यवस्था ढासाळली आहे. नियम नाही. ठरविकांची दादागिरी वाढत गेली आहे. ममता बॅनर्जी यांचा आशिर्वाद असल्याने गुंडगिरीत वाढ झालेली आहे. केवळ सांगून किंवा नियमाने कारवाई करीत बसला तर अनेक भाजपाचे नेते, कार्यकर्ते गोळीचा निशाणा बनतील. त्यापुर्वी योगी पॅटर्न तातडीने राबविण्याची गरज आहे. भाजप नेते सुवेंदु अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ यांचा मारेकरी दुरचा नाही. तो स्थानिक असला पहिजे. चंद्रनाथ रथ यांची पुर्ण माहिती असणारा हल्लेखोर असला पाहिजे. तो सापडेल किंवा शोधावे लागेल. तो पर्यंत इतर भाजपा, हिंदु नेत्याची हत्त्या होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिस यंत्रणेनी तातडीने कडक पावले उचलिण्याची गरज आहे. निवडणुका झाल्या, निकाल लागला, अजून नवीन सरकार सत्तेत येण्यासाठी वेळ लागत आहे. नवीन सरकारच्या पुर्वसंध्येला हा हल्ला मध्ये एक प्रकारचे आव्हान आहे हे लक्षात घेतले पाहिजे. जो कोणी मुख्यमंत्रीपदी विराजमान होईल त्यांना पहिल्या टप्प्यात योगी पॅटर्न राबवावा लागेल तरच शिस्त लागणार आहे. प.बंगाल मध्ये ममता बॅनर्जी मतासाठी व सत्तेच्या लालचापोटी कायदा व सुव्यस्थेकडे लक्ष दिले नाही. कायदा हातात घेणारे अनेकजन सापडतील. त्यामुळे सर्वात मोठी सतर्कता आवश्यक आहे. कायदा मोडणाऱ्यास योगी पॅटर्नचा हिसका दाखविल्याशिवाय शिस्त लागणार नाही. भाजप नेते सुवेंदु अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ यांची हत्त्या करणे मोठे धाडसाचे काम आहे. एक आव्हान आहे. भाजपा सरकार काय करेल, त्यांची जिरवविण्याची ताकद आमच्यात आहे असे विचार हिंसा घडविऱ्याचे असू शकतात. जसा निवडणुक निकाला जाहिर झाला तसे कायदा व सुव्यवस्था बिघडत चालली आहे. लोकनियुक्त सरकारने कारभार हाती घेतला नाही त्यापुर्वीच हिंसा घडविली जात आहे. याचा अर्थ नव्या सरकारवर दबाब व भिती निर्माण करण्याचा हा भेकड प्रयत्न असण्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्रिय गृहमंत्रालयाने वेळीच दखल घेवून वेगळा नियम प.बंगालमध्ये राबविण्याची गरज आहे. भाजप नेते सुवेंदु अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ हत्त्या एक आव्हान आहे. हे लक्षात घेता. एकास दहा हा पॅटर्न राबविला पाहिजे. देशद्रोही विचाराचे लोक असे कृत्य करीत असतो. त्यामुळे कडक धोरणाबरोबर कडक कायदा व सुव्यवस्थळेची राजनिती राबविण्याची गरज आहे. एक आव्हान म्हणून अशांच्या हिंसक वृत्तीचा नायनाट केला पाहिजे. कडक धोरणाची अमलबजावणी करणे काळाची गरज आहे.

# मानवतेची अखंड ज्योत : जागतिक रेड क्रॉस दिन

मानवजातीच्या इतिहासात युद्धे, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, दुष्काळ आणि विविध संकटांनी नेहमीच माणसाच्या अस्तित्वासमोर मोठे प्रश्न उभे केले आहेत. अशा संकटांच्या काळात मानवतेच्या रक्षणासाठी काही संस्था आणि व्यक्ती देवदूतासारख्या धावून येतात. जगभरात दुःख, वेदना आणि संकटात सापडलेल्या लोकांना आधार देणाऱ्या अशाच महान चळवळीचे नाव म्हणजे रेड क्रॉस होय. दरवर्षी ८ मे हा दिवस 'जागतिक रेड क्रॉस दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानवतेची सेवा, सहानुभूती, करुणा आणि निःस्वार्थ वृत्ती यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. रेड क्रॉस चळवळीचे संस्थापक हेन्री ड्युनाँ यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जगभर साजरा केला जातो. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक, सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मानवतेच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या रेड क्रॉस चळवळीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १८५९ साली इटलीतील सोल्फेरिनो येथे फ्रान्स आणि ऑस्ट्रिया यांच्यात भीषण युद्ध झाले. या युद्धात हजारो सैनिक जखमी झाले होते. युद्धभूमीवर जखमी सैनिक वेदनेने तडफडत होते, परंतु त्यांच्यासाठी पुरेशी वैद्यकीय मदत उपलब्ध नव्हती. त्या वेळी स्वित्झर्लंडचे व्यापारी आणि समाजसेवक हेन्री ड्युनाँ तेथे उपस्थित होते. त्यांनी ही भीषण परिस्थिती पाहिली आणि त्यांचे मन व्यथित झाले. त्यांनी स्थानिक लोकांना एकत्र करून जखमी सैनिकांना मदत करण्यास सुरुवात केली. 'टुट्टी फ्रेटेली' म्हणजे 'आपण सर्व भाऊ आहोत' हा संदेश देत त्यांनी मानवतेची एक नवीन दिशा जगासमोर ठेवली.

या अनुभवातून प्रेरित होऊन हेन्री ड्युनाँ यांनी 'अ मेमरी ऑफ सोल्फेरिनो' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये त्यांनी युद्धातील अमानुष परिस्थितीचे वर्णन केले आणि युद्धग्रस्तांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी मदतसंस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. त्यांच्या या विचारांना जगभरातून प्रतिसाद मिळाला आणि १८६३ साली आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस समितीची स्थापना झाली. पुढे १८६४ मध्ये जिनिव्हा करार झाला आणि युद्धातील जखमी सैनिकांच्या संरक्षणासाठी काही आंतरराष्ट्रीय नियम निश्चित करण्यात आले. याच क्षणापासून रेड क्रॉस चळवळीचा जागतिक प्रवास सुरू झाला.

रेड क्रॉस चळवळीची सात मूलभूत तत्त्वे ही तिच्या कार्याची खरी ओळख आहेत. मानवता, निष्पक्षता, तटस्थता, स्वातंत्र्य, स्वयंसेवा, एकता आणि सार्वत्रिकता ही तत्त्वे केवळ शब्द नसून मानवतेच्या सेवेसाठी जगणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या कार्याचे अधिष्ठान आहेत. मानवता हे तत्त्व सर्वांत महत्त्वाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत माणसाचे दुःख कमी करणे आणि त्याचे जीवन सुरक्षित ठेवणे हे रेड क्रॉसचे प्रमुख उद्दिष्ट आहे. निष्पक्षता म्हणजे जात, धर्म, भाषा, वर्ण किंवा राजकीय विचार न पाहता सर्वांना समान मदत करणे. तटस्थतेमुळे रेड क्रॉस कोणत्याही राजकीय किंवा लष्करी संघर्षात पक्षपाती भूमिका घेत नाही. त्यामुळेच जगभरातील लोकांचा या संस्थेवर विश्वास टिकून आहे.

रेड क्रॉसचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या काळातही ही संस्था मोठ्या प्रमाणावर मदतकार्य करते. भूकंप, पूर, चक्रीवादळ, त्सुनामी, दुष्काळ यांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसचे स्वयंसेवक तातडीने घटनास्थळी पोहोचतात. तेथे अन्न, पाणी, औषधे, निवारा आणि मानसिक आधार उपलब्ध करून देतात. अनेक वेळा अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणाही अपुऱ्या पडतात, परंतु रेड क्रॉसचे स्वयंसेवक जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू ठेवतात. त्यामुळे लाखो लोकांचे प्राण वाचतात आणि त्यांना नवजीवन मिळते.

आरोग्य क्षेत्रामध्ये रेड क्रॉसचे योगदान




अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्तदान चळवळीमध्ये या संस्थेची भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. जगभरात रक्तदान शिबिरे आयोजित करून लाखो रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य रेड क्रॉस करत आहे. आजही अपघात, शस्त्रक्रिया किंवा विविध आजारांमुळे अनेक रुग्णांना रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तदान हे सर्वांत मोठे दान मानले जाते. रेड क्रॉसने समाजात रक्तदानाविषयी जागृती निर्माण केली आहे. 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश या संस्थेने प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात रेड क्रॉसने दिलेली सेवा संपूर्ण जगाने अनुभवली. त्या कठीण काळात लाखो लोकांना अन्न, औषधे, ऑक्सिजन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात रेड क्रॉसने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लोकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण असताना रेड क्रॉसचे स्वयंसेवक धैर्याने काम करत होते. अनेकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवले. महामारीच्या काळात मानवतेचे खरे दर्शन घडवणाऱ्या संस्थांमध्ये रेड क्रॉसचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

भारतात रेड क्रॉस चळवळीची स्थापना १९२० साली झाली. भारतीय रेड क्रॉस सोसायटीने देशभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचवणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देणे आणि आपत्तीग्रस्तांना मदत करणे ही या संस्थेची प्रमुख कामे आहेत. भारतामध्ये पूर, भूकंप, दुष्काळ आणि चक्रीवादळांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसने दिलेली मदत लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

महाराष्ट्रातही रेड क्रॉसचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. पूरग्रस्त भागांमध्ये मदतकार्य, आरोग्य शिबिरे, रक्तदान मोहिमा आणि विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून ही संस्था समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहे. ग्रामीण भागात प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देऊन अनेकांचे जीव वाचवण्यास मदत होत आहे. आजच्या काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित स्वयंसेवकांची गरज वाढत आहे आणि रेड क्रॉस या क्षेत्रात प्रभावीपणे कार्यरत आहे.

रेड क्रॉसच्या कार्यामध्ये युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. महाविद्यालये आणि शाळांमध्ये युवक रेड क्रॉसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवा, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित केली जाते. युवकांनी समाजासाठी काम करावे, रक्तदान करावे, पर्यावरण संवर्धनात सहभागी व्हावे आणि संकटाच्या काळात लोकांना मदत करावी, हा संदेश युवक रेड क्रॉसद्वारे दिला जातो. आजच्या तरुण पिढीमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी ही चळवळ अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यामागे केवळ संस्थेच्या कार्याचा गौरव करणे हा उद्देश नाही, तर समाजामध्ये मानवतेची भावना रुजवणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली तरी मानवी संवेदनशीलता अनेक ठिकाणी कमी होताना दिसते. स्वार्थ, स्पर्धा आणि भौतिकवादाच्या या काळात माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्था मानवतेचे महत्त्व अधोरेखित करतात.

मानवतेच्या सेवेसाठी आर्थिक संपत्तीपेक्षा संवेदनशील मनाची अधिक गरज असते. एखाद्या संकटग्रस्त व्यक्तीला आधार देणे, भुकेल्याला अन्न देणे, रक्तदान करणे किंवा आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणे या छोट्या कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवू शकतात. रेड क्रॉस आपल्याला हेच शिकवते की, मानवतेपेक्षा मोठा धर्म कोणताही नाही.

आज जगभरात युद्ध, दहशतवाद, हवामान बदल आणि महामारी यांसारखी अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. लाखो लोक विस्थापित होत आहेत, अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्थांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. मानवतेच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या या संस्था जगात आशेचा किरण निर्माण करतात. तंत्रज्ञानाच्या मदतीने रेड क्रॉसने आपले कार्य अधिक प्रभावी केले आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी आधुनिक साधने, माहिती तंत्रज्ञान आणि संप्रेषण माध्यमांचा वापर करून मदतकार्य अधिक वेगाने केले जात आहे.

रेड क्रॉसचे स्वयंसेवक हे या चळवळीचे खरे शिल्पकार आहेत. कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजासाठी काम करणारे हे स्वयंसेवक मानवतेची जिवंत उदाहरणे आहेत. अनेक वेळा स्वतःच्या कुटुंबाची चिंता बाजूला ठेवून ते संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जातात. त्यांच्या सेवेमुळेच लाखो लोकांना नवजीवन मिळते. त्यांच्या कार्यामुळे समाजामध्ये सहकार्य, बंधुभाव आणि एकतेची भावना निर्माण होते.

जागतिक रेड क्रॉस दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. समाजात असलेल्या दुःख आणि वेदना कमी करण्यासाठी प्रत्येकाने काही ना काही योगदान दिले पाहिजे. रक्तदान, अवयवदान, स्वयंसेवा, पर्यावरण संवर्धन किंवा शिक्षणाच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करता येऊ शकते. माणसाने केवळ स्वतःपुरता विचार न करता समाजाच्या कल्याणासाठी पुढे आले पाहिजे. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित आणि सुखी असेल, तरच खऱ्या अर्थाने मानवतेचा विजय होईल.

आज अनेक तरुण सामाजिक कार्याकडे वळताना दिसत आहेत, ही सकारात्मक बाब आहे. समाजमाध्यमांच्या माध्यमातून जनजागृती, निधी संकलन आणि मदतकार्य अधिक प्रभावीपणे केले जात आहे. परंतु केवळ ऑनलाईन सहानुभूती पुरेशी नसून प्रत्यक्ष कृती अधिक महत्त्वाची आहे. रेड क्रॉसची शिकवण आपल्याला कृतीशील मानवता शिकवते. संकटाच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे हीच खरी देशसेवा आणि मानवसेवा आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, जागतिक रेड क्रॉस दिन हा मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. हेन्री ड्युनाँ यांनी सुरू केलेली ही चळवळ आज जगभरातील लाखो लोकांसाठी आशेचा आधार बनली आहे. सेवा, सहानुभूती, बंधुभाव आणि निःस्वार्थ वृत्ती या मूल्यांवर उभी असलेली रेड क्रॉस चळवळ मानवतेचा खरा चेहरा जगासमोर मांडते. आजच्या काळात प्रत्येकाने या चळवळीपासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात मानवतेची भावना जोपासली पाहिजे. कारण शेवटी माणसाला माणसाचीच गरज असते, आणि संकटाच्या काळात पुढे येणारा मदतीचा हातच खऱ्या अर्थाने मानवतेचा लाल ध्वज ठरतो.

-डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल - bagate.rajendra5gmail.com

# उन्हाळ्यात रोज लिंबू सरबत पिणे योग्य की अयोग्य?

उन्हाचा पारा वाढला की, लोकांना सतत काहीतरी थंड पिण्याची किंवा खाण्याची इच्छा होत राहते. बाहेर कुठेही गेलात आणि पाहिलं तर असं दिसतं की, जास्तीत जास्त लोक घराबाहेर पडल्यावर ऊसाचा रस किंवा लिंबू सरबत पितात. बरेच लोक असेही असतात जे उन्हापासून बचावासाठी किंवा शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी लिंबू सरबत पितात. पण या दिवसांमध्ये रोज लिंबू सरबत पिणं आरोग्याच्या दृष्टीने खरंच फायदेशीर असतं का? हा प्रश्न फार महत्वाचा ठरतो. अशात एक्सपर्ट सांगतात की, उन्हाळ्यात लिंबू सरबत रोज पिणं फायदेशीर असतं, पण ते पिण्याची योग्य पद्धत माहीत असली पाहिजे. आता ती पद्धत काय आहे हे जाणून घेऊया किंवा लिंबू सरबत पिताना काय काळजी घ्यावी हे पाहुयात.

उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे शरीरातील पाणी आणि आवश्यक मिनरल्स कमी होतात. लिंबू सरबताने या गोष्टींची कमतरता लगे भरून निघते. शरीर हायड्रेट राहतं आणि आतून थंड राहतं. इतकंच नाही तर लिंबामध्ये व्हिटामिन सी भरपूर प्रमाणात असतं. ज्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. अशात आपल्याला दिवसभर ऊर्जा मिळते आणि फ्रेश वाटतं. लिंबू सरबत प्यायल्याने आपलं पोट हलकं राहतं. जर आपल्याला अपचन, गॅस किंवा पोटात जडपणा जाणवत असेल तर याने आराम मिळतो. लिंबू सरबताचा सगळ्यात मोठा फायदा म्हणजे याने शरीरातील विषारी तत्व बाहेर पडण्यास मदत मिळते. ज्यामुळे अनेक आजारांचा धोकाही कमी होतो.

**हेल्दी लिंबू सरबत कसं बनवाल?**

लिंबू सरबत करायचं म्हटलं तर जास्तीत जास्त लोक यात भरपूर साखर घालतात. पण यात जास्त साखर घालण्याऐवजी थोडं मीठ घाला किंवा थोडं मध घाला. मीठ आणि मधाने सरबताची टेस्ट तर वाढतेच, सोबतच घामामुळे शरीरातून निघून गेलेले इलेक्ट्रोलाइट्सही परत मिळतात. नेहमी लक्षात ठेवा की, लिंबू सरबतात जास्त साखर घातल्याने त्याचे फायदे कमी होतात.

**काय काळजी घ्याल?**

- लिंबाच्या रसामध्ये भरपूर ॲसिड असतं. त्यामुळे लिंबू सरबत फार जास्त प्रमाणात प्याल तर याने दातांच्या वरचा थर डॅमेज होऊ शकतो.

- आपल्याला जर नेहमीच ॲसिडिटी किंवा पोटात जळजळ होण्याचा त्रास असेल, तर लिंबू सरबत कमी प्रमाणात प्यावं. जास्त प्याल तर त्रास आणखी वाढू शकतो.

उन्हाळ्यात रोज लिंबू सरबत पिणं फायदेशीर आहेच. पण त्यात साखरेचं प्रमाण कमी ठेवा आणि कमी प्रमाणातच प्या. जेणेकरून नुकसानऐवजी त्यातून अनेक फायदे मिळवता येतील.

## अधिक मासानिमित्त तुम्ही जावयाला पुढील पदार्थांचे वाण देऊ शकता.



अधिक मास किंवा पुरुषोत्तम मास आता लवकरच सुरू होत आहे. या महिन्याला धोंड्याचा महिना असं देखील म्हटलं जातं. अधिक मासाच्या महिन्यात सगळ्यात जास्त महत्त्व असते ते जावयाला. या महिन्यात जावयाला घरी जेवणासाठी आमंत्रित केले जाते आणि त्याला वाण म्हणून काही गोड पदार्थ दिले जातात. त्यासोबतच आपल्या ऐपतीनुसार सोन्या-चांदीची एखादी वस्तू आणि कपड्यांचा आहेरही केला जातो. आता जावयाला वाण म्हणून नेमकं काय द्यावं आणि ते कसं द्यावं ते पाहुया..

अधिक मासानिमित्त जावयाला कशाचे वाण दिले जाते?

आपल्याकडे अशी परंपरा आहे की एक ताट जावयासाठी घेतले जाते. अगदी स्टीलचे, तांब्याचे, पितळाचे ताटही तुम्ही घेऊ शकता. ज्यांना परवडतं ते चांदीच्या ताटातही वाण देतात. मुळात कशात वाण द्यायचे हा मुख्य प्रश्न नसतोच. तर वाण म्हणून काय द्यावे हे महत्त्वाचे असते.

या ताटामध्ये एक दिवा ठेवला जातो आणि त्यामध्ये प्रामुख्याने ३३ अनारसे ठेवून वाण दिले जाते. आता एवढे अनारसे द्यायचे नसतील तर तुम्ही ३३ बत्तासे ठेवून त्याचेही वाण देऊ शकता.

अनारसे, बत्तासे किंवा इतर कोणताही पदार्थ ३३ वेळा देण्यापेक्षा वेगवेगळ्या प्रकारचे लाडू, करंजी, चिक्की असे वेगवेगळे गोड पदार्थ मिळून ३३ असेही देऊ शकता.

सुकामेव्याचे वाणही देऊ शकता. यापैकी अंजीर, मनुका, खजूर असे गोड पदार्थ द्या. किंवा बदाम, काजू, पिस्ता, अक्रोड असं सगळंच ३३ वेळा द्या. असं आरोग्यदायी वाण कोणालाही आवडेलच...

किंवा नुसताच सुकामेवा देण्याऐवजी तो सगळा एकत्र करा आणि त्याचे ३३ लाडू करून ते वाण म्हणून द्या.

हल्ली बरेच जण हेल्थ कॉन्शस झालेले आहेत. त्यामुळे जावयाला तिळाची चिक्की, दाण्यांची चिक्की, फुटाण्यांची चिक्की, मुरमुऱ्यांची चिक्की, मखाना चिक्की असे गूळ घालून केलेल्या चिक्कीचे वेगवेगळे प्रकारही देऊ शकता. त्यात साखर घालणं टाळा.

## जाळीदार खमन ढोकळा घरीच करा; सोपी कृती, १० मिनिटांत होईल ढोकळा



मऊ, जाळीदार ढोकळा खायला सर्वांनाच आवडतो हा एक उत्तम नाश्त्याचा पर्याय आहे. घरी केलेला ढोकळा फुलत नाही, बिघडतो अशी अनेकांची तक्रार असते. ढोकळा करण्यासाठी तुम्ही काही खास ट्रिक्स फॉलो करू शकता. ज्यामुळे तुम्ही घरच्याघरी केलेला ढोकळा टेस्टी आणि पौष्टीक होईल. सगळ्यात आधी एका भांड्यात चिमूटभर हळद, १ चमचा साखर आणि ३ ते ४ चमचे पाणी घेऊन चमच्यानं व्यवस्थित ढवळून घ्या. बेसन, मिरचीची पेस्ट घाला, पाणी घालून चमच्यानं व्यवस्थित ढवळून घ्या. त्यात बेकिंग सोडा किंवा इनो घालून चमच्याच्या साहाय्यानं व्यवस्थित मिक्स करून घ्या. नंतर हे मिश्रण एका ट्रे मध्ये घालून व्यवस्थित वाफवून घ्या.

ढोकळा तयार झाला आहे की नाही ते पाहण्यासाठी त्यात सुरी किंवा टूथ पिक घालून पाहा. टूथ पिकला काहीही चिकटले नाही तर ढोकळा व्यवस्थित तयार झाला आहे. जर टुथपिकला ढोकळा चिकटला तर अजून ५ मिनिटं शिजवून घ्या. तयार ढोकळ्यावर फोडणीचं मिश्रण घाला. गरमागरम ढोकळा तुम्ही चटणीसोबत सर्व्ह करू शकता.



**ढोकळ्यासाठी चटणी कशी करतात?**

एका मिक्सरच्या भांड्यात कढीपत्ता, कोथिंबीर, लसूण, पुदीना, शेंगदाणे, मीठ, गूळ आणि पाणी हे पदार्थ घालून मिक्सरमधून फिरवून घ्या. बारीक पेस्ट तयार झाल्यानंतर हे मिश्रण वाटीत काढून घ्या. तुम्ही तुमच्या आवडीनुसार हे मिश्रण कमी- जास्त करू शकता. तसंच यावर कोथिंबीर घालून सर्व्ह करा.

**ढोकळा परफेक्ट होण्यासाठी टिप्स**

१) ढोकळ्यासाठी नेहमी बारीक दळलेले बेसन वापरा. बेसन चाळून घेतल्यास त्यात गुठळ्या होत नाहीत आणि हवा खेळती राहिल्यामुळे ढोकळा छान फुलतो.

२) पिठात थोडे आंबट दही किंवा ताक घातल्याने आंबवण प्रक्रिया चांगली होते आणि ढोकळ्याला छान जाळी पडते.

३) पिठाचे मिश्रण खूप घट्ट किंवा खूप पातळ नसावे. पीठ एकाच दिशेने किमान ५ ते ७ मिनिटे फेटावे. यामुळे त्यात हवा भरली जाते आणि ढोकळा हलका होतो.

# दीदींची दादागिरी संपली

सलग तीन विजयांमुळे राष्ट्रीय पातळीवर जाण्याची स्वप्ने ममता पाहू लागल्या. 'इंडिया' आघाडी व काँग्रेसला त्या तुच्छ समजू लागल्या. ही आघाडी मजबूत व्हावी असे पराभवानंतर त्यांना वाटत आहे. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष जिंकला आहे, तृणमूल काँग्रेसचा दारुण पराभव झाला आहे हे निकालांनी स्पष्ट केले. तरी मावळत्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी जन-तेचा कौल स्वीकारण्यास तयार नाहीत. भवानीपूर मतदार संघातून आपण हरलो आहोत हेही त्यांना मान्य नाही. त्यांची ही एकारलेली वृत्तीच त्यांच्या पराभवाला कारण ठरली आहे. भाजपचा पराभव आपणच करू शकतो या त्यांच्या अहंकाराला भाजपच्या पारड्यात मते व जागा टाकून बंगाली नागरिकांनी तडा दिला आहे; पण ममता दीदी मात्र या निकालामागे 'कारस्थान' असल्याचे रडगाणे गात आहेत. जेव्हा नवे सरकार येईल तेव्हा ममता बॅनर्जी यांचा कार्यकाळ आपो-आप संपेल ही साधी कायदेशीर बाबही त्या लक्षात घेण्यास तयार



त्यांचे कार्यकर्ते पदाधिकारी, प्रशासन यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होऊ लागले. त्याची दखल मुख्यमंत्री व पक्षप्रमुख या नात्याने ममता यांनी घेतली नाही. राज्यातील वृत्तपत्रांच्या म्हणण्यानुसार या पक्षाने २०१८ मध्ये झालेल्या पंचायत निवडणुकीत सुमारे ४० टक्के ठिकाणी अन्य पक्षांना अर्ज दाखल करू दिले नाहीत. कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांना मारहाण होण्याचे प्रमाणही वाढले. त्याला गुंडगिरी म्हणावे लागेल. या मुळे डाव्या पक्षांचे कार्यकर्ते सामूहिकरीत्या भाजपकडे वळले. ममता यांच्या राजवटीविरुद्ध रोष वाढत होता. २०२१ मध्ये भाजपने ७७ जागा जिंकल्या हा इशारा होता, तिकडे ममता यांनी दुर्लक्ष केले कारण त्यांना पुन्हा २०० पेक्षा जास्त जागा मिळाल्या होत्या. आधी त्यांना मुस्लिम तसेच हिंदू समाजाचा पाठिंबा होता. नंतर भाजपने पद्धतशीर ध्रुवीकरण केले. ममता यांच्या 'बंगाली अस्मिते'ला 'हिंदु अस्मितेने'

नाहीत. विद्यमान विधानसभेची आणि अर्थातच त्यांच्या मुख्यमंत्रिपदाची मुदत आजच संपत आहे. त्यांनी राजीनामा दिला नाही तर राज्यपाल त्यांना बडतर्फ करू शकतात. तीनदा सत्ता देणारे मतदार आपल्या विरोधात गेले आहेत हे वास्तव ममता यांच्या पचनी पडलेले नाही. गेल्या पाच वर्षांत राज्यातील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती बदलली आहे हे त्यांना समजलेच नाही असे दिसते. दीर्घ काळ सत्तेत राहिल्यावर जनतेपासून पक्ष व व्यक्ती कशी दुरावते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ममता व तृणमूल काँग्रेस आहे.

**इशार्यांकडे दुर्लक्ष**

ममता बॅनर्जी यांनी २००८मध्ये स्वतंत्र पक्ष स्थापन केला व बंगाल या आपल्या राज्यात सक्रिय झाल्या. २०११ मध्ये त्यांनी डाव्या आघाडीच्या सरकारचा पराभव केला. ती आघाडी सुमारे ३४ वर्षे सत्तेत होती, त्यांना जनता कंटाळली होती; त्यांना ममता व तृणमूलच्या रूपाने नवा पर्याय मिळाला. तेव्हा काँग्रेसच्या साथीने त्यांनी २२५ जागा जिंकल्या. नंतर त्यांनी काँग्रेसला दूर केले. ममता सरकारने सुरु केलेल्या विविध कल्याणकारी योजनांमुळे २०१६ मध्ये मतदारांनी त्यांना पुन्हा सत्ता दिली. विशेषत: लक्ष्मीर भांडार योजनेमुळे महिला त्यांच्या मागे उभ्या राहिल्या. त्या वेळी भाजपला ३ जागा मिळाल्या होत्या. या नंतर तृणमूलची सत्ता निरंकुश झाली.

भाजपने उत्तर दिले. बरेच मुस्लिम तृणमूल बरोबर असले तरी मोठा हिंदु वर्ग भाजपकडे वळला. राज्यात नवे उद्योग येत नव्हते, युवा वर्ग बेरोजगारीमुळे नाराज होता, कोलकात्यासारख्या राजधानीच्या शहरातही मूलभूत सुविधांची अवस्था वाईट आहे.ममता सरकारची कामगिरी चांगली नसल्याचे त्यातून दिसत होते. त्यामुळे शिक्षित/मध्यम वर्गात सरकारबद्दल नाराजी वाढली. आरजी कार रुग्णालयात महिला डॉक्टरवर झालेला बलात्कार व तिची हत्या यामुळे महिलांची सुरक्षा व कायदा व सुव्यवस्थेची ढासळलेली स्थिती समोर आली. ममता यांनी या प्रकरणीही इतरांवर दोष ढकलला.महिला मतदार यामुळे दुरावला. ममता यांनी महिलांवर अक्षरश: खैरात केली तरी त्या महिलांचा विश्वास परत मिळवू शकल्या नाहीत. त्यांच्याच मतदार संघात त्यांचा पराभव झाला या वरूनच त्यांनी सर्व घटकांचा पाठिंबा गमावला असल्याचे सिद्ध होते. ममता यांनी २०११ मध्ये बंगाली जनतेस नवी आशा दाखवली होती. तेच भाजपने आता केले आहे. तो पक्ष किती काळ सत्तेत राहील, हे काळच ठरवेल. मात्र दीदींची 'दादागिरी' संपली आहे हे नक्की.

# राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ईएसआयसी रुग्णालये उभारण्याचा प्रयत्न - कामगार मंत्री आकाश फुंडकर

## नवीन कामगार संहितेनुसार ४० वर्षांवरील कामगारांसाठीच्या वार्षिक आरोग्य तपासणी शिबिराचा राज्यात शुभारंभ





**पुणे/पीआयबी:** राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये औद्योगिक क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असून, त्या सर्व ठिकाणी कर्मचारी राज्य विमा निगमाची (ईएसआयसी) रुग्णालये उभारण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी केले.

पुण्यातील बिबवेवाडी येथील ईएसआयसी रुग्णालय येथे नवीन कामगार संहितेनुसार ४० वर्षांवरील कामगारांसाठीच्या वार्षिक आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह रमेश कर्मचारी राज्य विमा योजना आयुक्त रमेश चव्हाण, इतर वरीष्ठ इतर अधिकारी, तसेच कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन कामगार कायद्यांतर्गत प्रस्तावित केल्यानुसार, ४० वर्षे आणि त्यावरील वयोगटातील कामगारांसाठीचा हा देशव्यापी वार्षिक आरोग्य तपासणी उपक्रमाचा शुभारंभ आज कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, बसैदारापूर, नवी दिल्ली येथे केंद्रीय कामगार आणि रोजगार तसेच युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या हस्ते करण्यात आला. याच वेळी देशातील इतर ११ एडखउ रुग्णालयांमध्येही सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यामध्ये पुण्यातील एडखउ रुग्णालयाचाही समावेश आहे.

पुण्यात आयोजित कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले कामगार मंत्री आकाश फुंडकर आपल्या भाषणामध्ये म्हणाले की कामगारांना कोणताही आजार उद्भवण्यापूर्वीच त्यांची आरोग्य तपासणी करणे हा सरकारचा मानस आहे. नियमित तपासणीमुळे गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन कामगारांना मोठ्या आरोग्य धोक्यांपासून वाचवता येईल. सध्या राज्यात औद्योगिकीकरण वाढत असून कामगारांची संख्याही मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. अशा स्थितीत ईएसआयसी रुग्णालयांची गरज भासणार असून केंद्र सरकारसोबत यासंदर्भात सल्लामसलत करून रुग्णालयांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असेही कामगार मंत्री फुंडकर यांनी सांगितले. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी औद्योगिक अपघातांमध्ये जखमी होणाऱ्या कामगारांना तत्काळ उपचार मिळण्याच्या दृष्टीने खासगी रुग्णालये आणि डॉक्टरांची मदत घेण्याबाबत सकारात्मक विचार करण्याची गरज व्यक्त केली. अनेक खासगी रुग्णालये आणि डॉक्टर ही सेवा मोफत देण्यास तयार आहेत, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.


बिल्डींगला रंग देण्याची चिंता मिटली........

**मजगे कलर होम**

बार्शी रोड, लातूर.

रंग कामगार उपलब्ध



रायबा ग्राफिक्स

सोशल मीडिया डिझाइनर

काळानुसार बनवा आपली वेगळी ओळख सोशल मीडियाच्या माध्यमातून

• वाढदिवस • सण उत्सव • लग्न पत्रिका • विकासकामे • जयंती पुण्यतिथी • सुविचार

आकर्षक बॅनर डिझाइन तसेच व्हिडिओ साठी आजच संपर्क करा.

महेश सोळंके - 8275892938

M.S.Creation M.S.Creation YT



**मध्य रेल्वे**

**सोलापुर मंडळ**

**डॉक्टरों के लिए वॉक-इन इंटरव्यू**

अधिसूचना क्रमांक SUR/P/G-Z/CMP/KWW/II/2026, दिनांक २९.०४.२०२६ अन्वये, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागांतर्गत SDH/KWW उपविभागीय रेल्वे रुग्णालय, कुर्डुवाडी येथे, नमूद केलेल्या स्थानानुसार, मकंत्राटी वैद्यकीय व्यावसायिकफ (CMP) यांची कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. **ही नियुक्ती जोपर्यंत आवश्यकता असेल तोपर्यंत, किंवा यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत, आणि अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून असेल. एक कंत्राटी वैद्यकीय व्यावसायिक (CMP) यांच्या नियुक्तीबाबतची अधिसूचना: उपविभागीय रेल्वे रुग्णालय, कुर्डुवाडी, सोलापूर विभाग, मध्य रेल्वे.** खुल्या बाजारपेठेतील इच्छुक उमेदवार किंवा निवृत्त शासकीय डॉक्टर, दिनांक १८.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहू शकतात. मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी आपला अर्ज, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे, Attempts Certificate(परीक्षेच्या प्रयत्नांचे प्रमाणपत्र) आणि इतर संबंधित कागदपत्रे सोबत आणावीत. मुलाखतीचे ठिकाण: विभागीय रेल्वे व्यवस्थापकांचे कार्यालय, कार्मिक शाखा, सोलापूर - ४१३ ००१. ही थेट मुलाखत एका समितीद्वारे दिनांक १८.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून घेतली जाईल. इच्छुक उमेदवार/निवृत्त व्यक्तींनी आपला अर्ज, संबंधित कागदपत्रे आणि Attempts Certificate सह srdposurgmail.com या ईमेल आयडीवर पाठवून अर्ज करावा. उमेदवारांनी मुलाखतीसाठी येण्याचा खर्च स्वतः करावा. प्रकाशित झालेली सविस्तर अधिसूचना पाहण्यासाठी कृपया www.cr.indianrailways.gov.in **या संकेतस्थळाला भेट द्या. संकेतस्थळावर खालील क्रमाने माहिती उपलब्ध आहे:** Under Tab> About us ' > Division Solapur '> Personnel ' >Notification.

**व.म.का.अ., सोलापुर**

तुमची जनावरे रेल्वे रुळांपासून दूर ठेवा. 17


## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



वैवाहिक जीवनासाठी योग्य नाही आहे या गोष्टी - खास करून महिला, आपल्या पार्टनरसोबत सहवासाबद्दल बोलताना टाळण्याचा प्रयत्न करतात. कारण त्या यात स्वत:ला असहज जाणवतातकिंवा त्यांना असे वाटत की सहवासाबद्दल बोलण्याची काहीच गरज नसते. पण हिच सर्वात मोठी चूक आहे जी तुमची सेक्स लाईफ बरबाद करू शकते. तर पाहूया त्या ७ गोष्टींकडे ज्या तुमच्या सेक्स लाईफसाठी योग्य नाही आहे. **५. रूटीन फॉलो करू नये** - स्पॉन्टेनियस अर्थात स्वाभाविक बना. रोज एक पद्धतीने सहवास करण्यापेक्षा नवीन पद्धतीचा प्रयोग करा.

## २ Joke — विनोद




**दंतवैद्य**

गोपाळराव : तुमचे दंतवैद्य चांगले दात काढतात ना?

माधवराव : हो, ते चांगलेच दात काढतात. किडले असल्यास सिमेंट भरतात.

## ३ Message — संदेश



Zindagi mein tum bohooooot aage jaoge
kyoki Tum jaha bhi jaoge
log kahege chal-chal aage chal.

## ४ Thought — सुविचार



श्रीमंत मनुष्याला पुष्कळ मित्र असतात.

- चाणक्य

**संस्कृत सुभाषित**

अयथाबलमारम्भ: प्राणोपरोधिनाम् ।

अर्थ - कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच. आपल्या शक्तीपेक्षा जास्त कार्य आरंभिल्यास आयुष्यावर आणि शक्तीवरच त्याचा दुष्परिणाम होत असतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. वाईट काळात माणसाची वाईट गोष्टींकडे अधिक प्रवृती होते याअर्थी वाक्प्रचार
६. सुताराचे हत्यार
१०. वेदना
११. वटवट
१२. नुसताच बडबड करणारा
१३. हिंदुस्थान
१४. योग्य, उचित
१६. कप्पा, खण
१८. 'अखेरचे येतील माझ्या हेच शब्द ओठी' -- चुका असतील केल्या, केली पण प्रीती' (अरूण दाते)
२१. प्रेम, आपुलकी
२२. मनात घुसलेला आळस
२४. आजच्या आधीचा दिवस
२५. करांगुली
२६. पर्ण
२७. बंगाल
२८. घाव, प्रहार
२९. तांदळाची एक जात
३१. तांदूळाचे पीक
३३. नोकर
३५. न थांबता, अखंडपणे
३७. कारखान्यातील मजूर
३८. पेटलेला कोळसा
३९. निखळ सौंदर्य
४०. सदोदित
४१. फक्त, केवळ
४२. घरातील भांडण
४५. तांबड्या रंगाचे औषधी लाकूड
४८. शरीर
४९. उगाच
५१. खंदक
५३. जागा बदलणे
५६. शुभ्र पांढरे, स्वच्छ
५७. सुंदर तरुणी
५८. भीती
५९. चकाकणारे
६१. सारखा, सम
६२. नातेवाईक
६३. लाज
६४. चटकन, त्वरित
६६. मगज
६८. देशाचे नाणे
७१. मृत्यूदेवता
७२. दुर्लक्ष करणे (वाक्य प्रचार)
७४. मलईची बासुंदी
७५. शहर, गाव
७६. चांदी

### उभे शब्द

१. संकटात सापडलेल्या माणसाला छोटीशी मदतसुद्धा तारून नेते या अर्थाची म्हण
२. गडी माणसे
३. हालचालीवर ठेवलेली नजर
४. 'मधाचे बोट कुणी चाटवा' म्हणणाऱ्या लावणीतील आजार
५. पूजेचे ताट
६. दफनभूमी
७. पिरपिर करणारा
८. पोळ्यांचा वेगळा, डोशाचा वेगळा
९. हुरहूर, खंत व्यक्त करणे
१५. जेव्हा
१७. प्रख्यात
१९. बत्त्याचा साथीदार
२०. ओरिसातील पुरीचा श्रीकृष्ण
२१. पायापासून डोक्यापर्यंत
२३. उबदार पांघरुण (इंग्रजी)
२८. उत्तरधिकारी
३०. संधी
३१. हमाल
३२. मालाची कोठी, साठा
३४. हस्त
३५. अनादर, संकोच
३६. कहाणी
३८. संकट, रोग दूर करणारा
४२. सांसरिक माणूस
४३. तरंग, लाट
४४. हुबेहूब
४६. तरल, अस्थिर मन
४७. किंमत, मूल्य
५०. ब्रह्मदेवाचे जन्मस्थान
५२. नमस्कार
५४. कोल्ह्यासारखा एक प्राणी
५५. होडी
५६. शाळा, प्रशाला
५७. आईचा दादा
५९. झोंबणारे, खरमरीत
६०. पोपट
६१. मंत्रीमंडळ
६२. दूर होणे, बाजूला होणे
६५. उलटी, ओकारी
६६. घसा
६७. तांदळाच्या कण्यांची पेज
६९. मऊ
७०. वेदना, मस्तकशूळ
७३. मस्तक

### आडवे उत्तरे

१.बुडत्याचा पाय खोलात ६.करवत १०.कळ ११.बडबड १२.वाचाळ १३.भारत १४.लायक १६.रकाना १८.लाख २१.आस्था २२.मरगळ २४.काल २५.करंगळी २६.पान २७.वंग २८.वार २९.कमोद ३१.भात ३३.चाकर ३५.अथक ३७.कामगार ३८.निखारा ३९.आरसपान ४०.वारंवार ४१.मात्र ४२.गृहकलह ४५.रक्तचंदन ४८.देह ४९.हकनाक ५१.चर ५३.स्थलांतर ५६.विमल ५७.रमणी ५८.डर ५९.चकचकीत ६१.समान ६२.सगा ६३.शरम ६४.लवकर ६६.गर ६८.चलन ७१.यम ७२.कानाडोळा करणे ७४.रबडी ७५.नगर ७६.रजत

### उभे उत्तरे

१.बुडत्याला काडीचा आधार २.चाकरचुकर ३.पाळत ४.खोकला ५.तबक ६.कबरस्थान ७.रडका ८.तवा ९.हळहळणे १५.यदा १७.नामवंत १९.खल २०.जगन्नाथ २१.आपादमस्तक २३.रग २८.वारस ३०.मोका ३१.भारवाहक ३२.वखार ३४.कर ३५.अनमान ३६.कथा ३८.निवारक ४२.गृहस्थ ४३.लहर ४४.तंतोतंत ४६.चंचल ४७.दर ५०.नाभिकमल ५२.नमन ५४.लांडगा ५५.तर ५६.विद्यालय ५७.मामा ५९.चरचरीत ६०.कीर ६१.सरकार ६२.सरकणे ६५.वमन ६६.गळा ६७.कणेर ६९.नरम ७०.तिडीक ७३.डोके




## थोडक्यात/ संक्षिप्त

### क्रिकेट विश्वात खळबळ! क्रिकेट सोडणार वैभव सूर्यवंशी?

मुंबई –इंडियन प्रिमिअर लीगच्या १९ व्या पर्वात दमदार फलंदाजी करुन १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने संपूर्ण क्रिकेट जगाचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतलं आहे. अनेक आजी–माजी क्रिकेटपटुंनी वैभवची फलंदाजी आणि शैलीसंदर्भात आपआपली मतं व्यक्त केलेली असतानाच आता या यादीमध्ये इंग्लंडचा माजी कर्णधार मायकल वॉन आणि ॲलेस्टेअर कूक यांचाही समावेश झाला आहे. राजस्थान रॉयल्सच्या या अष्टपैलू युवा खेळाडूबद्दल हे दोघेही दिग्गज अगदी भरभरुन बोलले.

**सहा वर्षच क्रिकेट खेळणार वैभव?**

मस्टीक टू क्रिकेटफया पॉडकास्टवरील चर्चेदरम्यान वॉन आणि कूक यांनी १५ वर्षीय वैभवने आतापर्यंत आयपीएलमध्ये केलेल्या कामगिरीचं कौतुक केलं. मात्र त्याच वेळी या दोघांनीही वैभव कदाचित पुढील सहा वर्षच क्रिकेट खेळू शकेल अशी भीतीही व्यक्त केली आहे. म्हणजेच वैभव वयाच्या २१ व्या वर्षीच निवृत्ती जाहीर करु शकतो अशी शंका या दोघांनी व्यक्त केली आहे.

### फोगाट आशियाई खेळ २०२६ च्या निवड चाचण्यांसाठी अपात्र

दिल्ली–भारतीय कुस्ती महासंघाने जाहीर केलेल्या निकषांनुसार, तीन वेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेली विनेश फोगाट आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या निवड चाचण्यांसाठी अपात्र ठरली आहे. महासंघाच्या म्हणण्यानुसार, निवड चाचण्यांसाठीची पात्रता तीन देशांतर्गत स्पर्धांमधील पदक विजेत्यांपुरती मर्यादित आहे. २०२५ वरिष्ठ राष्ट्रीय कुस्ती चॅम्पियनशिप, २०२६ वरिष्ठ फेडरेशन कप आणि २० वर्षांखालील राष्ट्रीय कुस्ती चॅम्पियनशिप. वरिष्ठ राष्ट्रीय चॅम्पियनशिप डिसेंबरमध्ये, तर फ ेडरेशन कप फेब्रुवारीमध्ये आयोजित करण्यात आला होता.विनेश फोगाटने यापैकी कोणत्याही स्पर्धे त भाग घेतलेला नाही, कारण ती पॅरिस २०२४ ऑलिम्पिकपासून स्पर्धेपासून दूर आहे आणि त्यामुळे ती पात्रतेचे निकष पूर्ण करत नाही. उन्हाळी ऑलिम्पिकनंतर तिने लगेचच कुस्तीतून निवृत्ती घेतली होती.

### प्लेऑफ सामन्यांना ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू मुकणार?

मुंबई–ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघ तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी २३ मे रोजी पाकिस्तानमध्ये दाखल होणार आहे. आयपीएल स्पर्धा सुरू असतानाच पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने याला दुजोरा दिला. पीसीबीनुसार, ऑस्ट्रेलियन संघ २३ मे रोजी इस्लामाबादमध्ये दाखल होईल. त्यावेळी आयपीएलचा साखळी टप्पा पूर्ण झालेला असेल, तर प्लेऑफचा टप्पा सुरू होणार आहे. यामुळे ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू आयपीएलमधून अनुपस्थित राहतील का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. आयपीएलचा शेवटचा साखळी सामना २४ मे रोजी खेळला जाईल, त्यानंतर २६ मे रोजी प्लेऑफचा टप्पा सुरू होईल. पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना ३० मे रोजी रावळपिंडी क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाईल. दुसरा आणि तिसरा सामना अनुक्रमे २ आणि ४ जून रोजी लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमवर खेळला जाईल.

### मेस्सीच्या आयोजकाची तृणमूल काँग्रेसला उघड धमकी

दिल्ली–लिओनेल मेस्सीच्या गेल्या वर्षी कोलकात्यात झालेल्या 'गोट टूर' कार्यक्रमातील गोंधळाबाबत क्रीडा आयोजक सतद्रू दत्ता यांनी प्रथमच सार्वजनिकपणे भाष्य केले. १३ डिसेंबरला सॉल्ट लेक स्टेडियममध्ये झालेल्या या कार्यक्रमात मेस्सी, त्याचा माजी बार्सिलोना सहकारी लुईस सुआरेझ आणि माजी ॲटलेटिको मॅड्रिड खेळाडू रोड्रिगो डी पॉल हे अवघ्या २५ मिनिटांत स्टेडियममधून निघून गेले होते. कार्यक्रमस्थळी झालेला गोंधळ आणि प्रेक्षकांवरील नियंत्रण सुटल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली होती.त्या वेळी पश्चिम बंगालचे तत्कालीन क्रीडामंत्री अरूप बिस्वास, जे कार्यक्रमादरम्यान मेस्सीसोबत उपस्थित होते, यांच्यावर नोंदणी नसलेल्या लोकांना स्टेडियममध्ये प्रवेश दिल्याचा आरोप झाला होता.

# अखेर नशीब फळलं! लखनौने आरसीबीवर विजय मिळवत एका महिन्यानंतर जिंकला सामना

नवी दिल्ली: लखनौने आरसीबी संघाचा पराभव करत प्लेऑफच्या शर्यतीत त्यांना धक्का दिला आहे.

लखनौचं अखेर नशीब फळफळलं आणि संघाने आरसीबीचा पराभव करत एका महिन्यानंतर आयपीएल २०२६ मध्ये सामना जिंकला आहे. ऋषभ पंतने गेल्या सामन्यातील पराभवानंतर सामना जिंकण्यासाठी नशीबाची गरज असते, असं म्हटलं होतं. त्यानुसार लखनौच्या बाजूने आज नशीब असल्याने संघाने कमालीच्या सांघिक कामगिरीसह सामना जिंकला. आरसीबीचा अखेरच्या षटकात लखनौने ९ धावांनी पराभव केला, या पराभवासह आरसीबीची टेबल टॉपर होत प्लेऑफच्या दिशेने मोठं पाऊल टाकण्याची संधी हुकली आहे.



## दिग्वेशने अखेरच्या षटकात फिरवला सामना

अखेरच्या षटकात २० धावांची गरज असताना दिग्वेश राठीने कमालीचं अखेर षटक टाकलं. पहिल्या चेंडूवर लेग बायमुळे १ धाव मिळाली. यानंतर दुसऱ्या चेंडूवर कृणाल पंड्याने एक धाव घेतली. दिग्वेशने तिसरा चेंडू गुगली टाकला आणि शेफर्ड चेंडू खेळायला चुकला व डॉट राहिला. यानंतर चौथा चेंडू वाईड पडला, त्यानंतर ऋषभ पंतने त्याच्याशी चर्चा केली. चौथ्या लीगल चेंडूवर शेफर्डने चौकार मारला. तर पाचव्या चेंडूवर मोठा फटका खेळण्यासाठी शेफर्डने चेंडू उचलला, पण चेंडू बॅटवर नीट न आल्याने सीमारेषेच्या आत चेंडू पडला आणि अखेरच्या चेंडूवर १ धाव घेतल्याने आरसीबीने ९ धावांनी सामना गमावला.डीएलएल पद्धतीनुसार लखनौने २०९ धावांचा डोंगर उभारल्यानंतर आरसीबीला विजयासाठी २१३ धावांचं आव्हान देण्यात आलं. आरसीबीची सुरूवात मात्र खराब झाली आणि सुरूवातीच्या २ षटकांत जेकब बेथल व विराट कोहली बाद होत माघारी परतले. यानंतर देवदत्त पडिक्कल व रजत पाटीदार यांनी ९५ धावांची भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. देवदत्त पडिक्कल ३४ धावा करत बाद झाला. तर जितेश शर्मा एका धावेवर माघारी परतला. प्रिन्स यादवने विराट कोहलीनंतर ११व्या षटकात जितेश व पडिक्कलच्या मोठ्या विकेट्स घेतल्या. तर कर्णधार रजत पाटीदारने ३१ चेंडूत ३ चौकार व ६ षटकारांसह ६१ धावांची खेळी केली. यानंतर टीम डेव्हिडने आपलं रौद्र रूप दाखवलं. टीम डेव्हिडने १७ चेंडूत ४ चौकार व ३ षटकारांसह ४० धावांची खेळी करत बाद झाला. यानंतर कृणाल पंड्या व रोमारियो शेफर्डने संघाचा डाव सावरला. पण अखेरच्या षटकात दोघे संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाहीत. लखनौकडून प्रिन्स यादवने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. शाहबाज अहमदने २ तर मोहम्मद शमीने १ विकेट्स घेतल्या. आरसीबीने नाणेफेक जिंकत लखनौला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. पावसामुळे सामन्यात तीन वेळा व्यत्यय आल्याने सामना थांबवण्यात आला होता. पण लखनौच्या फलंदाजीवर याचा काहीच परिणाम झाला नाही, मिचेल मार्शने एका टोकाकडून संघाचा डाव सावरून धरत शतक झळकावलं. मिचेल मार्शने ५६ चेंडूत ९ चौकार व ९ षटकारांसह १११ धावांची वादळी खेळी केली. तर अर्शीन कुलकर्णीने १७ धावांचं योगदान दिलं. याशिवाय निकोलस पुरनने २३ चेंडूत ३८ धावा केल्या. कर्णधार ऋषभ पंतने शानदार खेळी करत संघाच्या मोठ्या धावसंख्येत फिनिशरची भूमिका निभावली.ऋषभ पंतने १९ चेंडूत ४ चौकार व २ षटकारांसह ३२ धावा केल्या. आरसीबीकडून जोश हेझलवूड, कृणाल पंड्या व रसिख सलाम दार यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या.

## संघांच्या बसमधून फिरतायत अनोळखी लोके,बीसीसीआय ने दिली वॉर्निंग

मुंबई–आयपीएल २०२६ ही स्पर्धा यंदा जेवढी त्यातील सामन्यांमुळे चर्चेत येतेय, त्याहून जास्त याच्याशी निगडित वादांमुळे चर्चेत येतेय. आधी राजस्थान रॉयल्सचे मॅनेजर डगआउटमध्ये फोनचा वापर करताना आढळले, त्यानंतर कर्णधार रियान पराग हा ड्रेसिंग रूममध्ये वेपिंग करताना आढळला आणि आता एक अशी गोष्ट समोर येतेय ज्यामुळे सर्वांनाच धक्का बसेल. माहिती अशी आहे की आयपीएलमधील काही संघ आणि त्यांचे खेळाडू बाहेरच्या लोकांसोबत दिसून आलेत. संघाच्या बसमधून आणि खेळाडूंसोबत असे खेळाडू फिरताना दिसतायत ज्यांना तिथे फिरण्याची परवानगी नाही. एवढंच नाही तर काही अनोळखी लोकं हे खेळाडू राहत असलेल्या हॉटेलमध्ये सुद्धा दिसून येतायत. बीसीसीआयचे सचिन देवाजीत सैकियाने या माहितीची पुष्टता केली असून सैकियाने सर्व खेळाडूंसाठी एक ॲडव्हायजरी जाहीर केलीये. त्यांनी सांगितलय की सर्व आयपीएल संघांनी नियमांचे पालन करावे, जर असं झालं नाही तर त्यांच्यावर कारवाई करावी. आयपीएलच्या सर्व खेळाडूंसाठी नियम आहे की त्यांनी संघाच्या बसमधून ट्रॅव्हल करावं. ते स्वत:च्या वैयक्तिक गाड्यांचा वापर करू शकत नाहीत. खेळाडूंना कुटुंबाच्या सदस्यांसोबत आणि मित्रांसोबत संघाच्या बसमध्ये जाण्याची परवानगी नसते. हे नियम सुरक्षा व्यवस्था लक्षात घेऊन बनवण्यात आले आहेत, तसेच यामुळे भ्रष्टाचाराला आळा घातला जाईल.

## आनंदवार्ता! सूर्यकुमार यादवला कन्यारत्न प्राप्त; तब्बल १० वर्षांनंतर आली सूर्याच्या घरी लक्ष्मी

नवी दिल्लीः भारतीय क्रिकेट संघाचा टी–२० कर्णधार आणि मिस्टर ३६० म्हणून ओळखला जाणारा फलंदाज सूर्यकुमार यादव याच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. सूर्यकुमार आणि त्याची पत्नी देविशा शेट्टी यांच्या घरी गोंडशी मुलीचे आगमन झाले आहे. या आनंदाच्या बातमीमुळे क्रिकेट चाहत्यांमध्येही अनंदाचे वातावरण आहे. सध्या सूर्यकुमार यादव आयपीएल २०२६ मध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळत आहे. मात्र अलीकडेच तो संघासोबत रायपूरला गेला नसल्याची चर्चा होती. आता त्यामागचे कारण समोर आले आहे. पत्नीच्या प्रसूतीमुळे तो मुंबईत कुटुंबासोबत थांबला होता. ही गोड बातमी समोर येताच चाहत्यांनी आणि क्रिकेटविश्वाने या बातमीवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.



गुरुवारी सकाळी देविशा शेट्टीने एका गोंडस मुलीला जन्म दिला. सूर्यकुमार आणि देविशा यांची ओळख कॉलेजपासूनच आहे. दोघांनी २०१६ मध्ये विवाह केला होता. लग्नानंतर तब्बल दहा वर्षांनी त्यांच्या आयुष्यात पहिल्या बाळाचे आगमन झाले आहे. सूर्यकुमार अनेकदा आपल्या यशाचे श्रेय पत्नी देविशाला देत आला आहे. कठीण काळात तिने दिलेला आधार त्याच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्याने कितेके मुलाखतीत सागंतले आहे. दरम्यान, आयपीएल २०२६ मध्ये सूर्यकुमार यादव सध्या अपेक्षित फॉर्ममध्ये दिसत नाही. गेल्या काही महिन्यांपासून त्याला सातत्याने मोठी खेळी करता आलेली नाही. टी–२० विश्वचषकातही त्याने केवळ एका सामन्यात चांगली कामगिरी केली होती.मात्र आता घरात आलेल्या या नव्या पाहुणीच्या आगमनामुळे सूर्यकुमारच्या आयुष्यात आनंदाचे वातावरण आहे. या चिमुकलीच्या पायगुणाने त्याला पुन्हा एकदा मैदानावर जुन्या लयीत फलंदाजी करता येईल, अशी अपेक्षा चाहत्यांकडून व्यक्त केली जात आहे. क्रिकेटविश्वातूनही त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## अमनप्रीत सिंग गिलचे वयाच्या ३६ व्या वर्षी निधन

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट वर्तुळातून एक अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली याचा १९ वर्षांखालील संघातील सहकारी आणि पंजाबचा माजी क्रिकेटपटू अमनप्रीत सिंग गिल याचे वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती, त्यानंतर त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



विराट कोहलीसोबतची मैत्री आणि कारकीर्द

अमनप्रीत सिंग गिल हा विराट कोहलीच्या सुरुवातीच्या क्रिकेट प्रवासातील महत्त्वाचे साथीदार होता. २००८ च्या ऐतिहासिक अंडर–१९ विश्वचषकापूर्वीच्या सराव शिबिरात आणि विविध वयोगटातील स्पर्धांमध्ये त्यांनी विराटसोबत मैदान गाजवले होते. अमनप्रीत हा एक प्रतिभावान अष्टपैलू खेळाडू म्हणून ओळखला जात होते. त्यांनी पंजाबसाठी देशांतर्गत क्रिकेटमध्ये मोलाचे योगदान दिले होते. आयपीएलच्या पहिल्या सत्रात देखील तो किंग्स इलेव्हन पंजाब संघातून खेळला होता.

क्रिकेट जगतातून श्रद्धांजली

अमनप्रीत याच्या निधनानंतर क्रिकेट विश्वातून हळहळ व्यक्त केली जात आहे. पंजाब क्रिकेट असोसिएशनसह बऱ्याच माजी आणि वर्तमान खेळाडूंनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. विराट कोहलीच्या त्या फळीतील बऱ्याच खेळाडूंनी अमनप्रीत यांच्या आठवणींना उजाळा दिला असून, एक चांगला मित्र आणि मेहनती खेळाडू गमावला, अशा भावना व्यक्त केल्या आहेत.निधनाचे कारण–मिळालेल्या माहितीनुसार, अमनप्रीत यांना यकृताशी संबंधित आजार होता. उपचारा दरम्यान त्यांची प्रकृती अधिक बिघडली आणि त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे कुटुंब आणि मोठा मित्रपरिवार आहे.

## युवा राष्ट्रीय नौकानयन अजिंक्यपद स्पर्धा २०२६ चा मुंबईत शुभारंभ

मुंबई–यॉटिंग असोसिएशन ऑफ इंडिया (वायएआय) युवा राष्ट्रीय नौकानयन अजिंक्यपद स्पर्धा सध्या मुंबईतल्या मार्वे इथल्या एच बी टी सी इथे सुरु आहेत. यॉटिंग असोसिएशन ऑफ इंडिया (वायएआय) संघटनेच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा, भारतातल्या शिडांच्या नौकानयन स्पर्धांपैकी, एक प्रतिष्ठेची स्पर्धा मानली जाते. या स्पर्धेच्या माध्यमातून, विविध गटांतून सहभागी होणारे गुणवान आणि होतकरू नौकानयनपटू, एकमेकांशी स्पर्धा करण्यासाठी एकत्र आले आहेत. या अजिंक्यपद स्पर्धेची सुरुवात ४ मे रोजी झाली असून, स्पर्धेचा समारोप ९ मे रोजी होणार आहे. हा पूर्ण आठवडाभर शिडांच्या नौकानयनासाठी अनुकूल असे वारे आणि सागरी परिस्थिती असल्यामुळे, विविध गटांतील अनेक शर्यती यशस्वीरित्या होत आहेत. यात, लेझर क्लास (आय सी एल ए ४ आणि आय सी एल ए ६), आय क्यू फॉईल्स, टेक्नो–२९३ विंडसर्फिंग, ४२० मिक्स्ड क्लास आणि २९ क्लास या स्पर्धांचा समावेश आहे.गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावण्यासाठी सहभागी खलाशी अर्थात स्पर्धक आपलं शिडांच्या नौकानयनाचं कौशल्य, खेळाची रणनीती आणि खेळातील सातत्य यांचं उत्कृष्ट प्रदर्शन करत आहेत.वाय ए आय युवा राष्ट्रीय शिडांची नौकानयन अजिंक्यपद स्पर्धा २०२६ आता अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे.

# १७ चौकार-षटकार अनब ४९ चेंडूत शतक! मिचेल मार्शचे लखनौमध्ये वादळ



## लखनौसाठी ही कामगिरी करणारा आयपीएलमधील पहिलाच खेळाडू

लखनौ सुपर जायंट्सचा खेळाडू मिचेल मार्शने वादळी फटकेबाजी करत शतक झळकावलं आहे. लखनौ सुपर जायंट्सचा सलामीवीर मिचेल मार्शने शतकी खेळी साकारली. त्याने लखनौच्या एकना क्रिकेट स्टेडियमध्ये सुरू असलेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या फॉर्मात असलेल्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. सामन्याच्या सुरुवातीपासूनच दमदार सुरूवात करत गोलंदाजांना बॅकफूटवर ठेवलं. आयपीएलमधील हे त्याचे दुसरे शतक आहे. मिचेल मार्शने गेल्या हंगामातही लखनौ संघासाठी आपलं पहिले आयपीएल शतक झळकावलं होतं. लखनौमध्ये होत असलेल्या सामन्यात सातत्याने पावसाने हजेरी लावली आहे. १४ षटकांनंतर आता तिसऱ्यांदा पावसामुळे सामना थांबला आहे. आरसीबीने नाणेफेक जिंकत लखनौला फलंदाजीसाठी पाचारण केलं. सलामीला उतरलेल्या मिचेल मार्श व अर्शीन कुलकर्णीच्या जोडीने पहिल्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी केली. यादरम्यान वादळी फटकेबाजी करणाऱ्या मार्शने शतकी खेळी साकारली.

मिचेल मार्शने चौकार आणि षटकारांचा वर्षाव केला. त्याने अवघ्या ४९ चेंडूंमध्ये आपलं शतक पूर्ण केलं, जे आयपीएलमध्ये आतापर्यंत लखनौ सुपर जायंट्सच्या खेळाडूने केलेलं सर्वात जलद शतक आहे. शतक पूर्ण करताना त्याने नऊ चौकार आणि आठ षटकार मारले; त्याच्या या वादळी खेळीने आरसीबीच्या प्रत्येक गोलंदाजाला हतबल केलं. मिचेल मार्श यासह लखनौ सुपर जायंटस संघासाठी सर्वात जलद शतक करणारा पहिलाच खेळाडू ठरला आहे. मिचेल मार्शच्या शतकासह लखनौ सुपर जायंट्स संघाने १४ षटकांत १ बाद १४५ धावा केल्या आहेत. १४ षटकं पूर्ण होताच पावसाने पुन्हा हजेरी लावल्याने सध्या सामना थांबलेला आहे. मिचेल मार्श १०७ धावांवर तर निकोलस पुरन १४ धावांवर खेळत आहे. या कमालीच्या सुरूवातीनंतर आता लखनौचा संघ किती धावांचा डोंगर उभारणार, यावर सर्वांच्या नजरा आहेत.

# इस्त्रायलमध्ये होम-बेस्ड केअरगिव्हर नोकऱ्यां- साठी जिल्ह्यातील युवक-युवतींना सुवर्णसंधी

**लातूर/धाराशिव प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या पुढाकारातून आणि नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन एनएसडीसी यांच्या सहकार्याने इस्त्रायलमध्ये होम-बेस्ड केअरगिव्हर पदांसाठी भरती प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यातील उमेदवारांना ही मोठी रोजगाराची संधी असून एकूण ३५०० पदे उपलब्ध आहेत. या पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा अंदाजे २ लाखापर्यंत वेतन मिळू शकते. इस्त्रायलमध्ये प्रशिक्षित केअरगिव्हरची मोठी मागणी असल्यामुळे भारतीय उमेदवारांना प्राधान्य दिले जात आहे.

पात्रता निकषांनुसार उमेदवारांचे वय २५ ते ४५ वर्षे दरम्यान असावे. किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे किमान ३ वर्षे वैध पासपोर्ट असावा, तसेच इंग्रजी भाषेचे मूलभूत ज्ञान आवश्यक आहे. शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे असून उंची किमान ४.५ फूट आणि वजन किमान ४५ किलो असावे.

उमेदवारांनी केअरगिव्हिंग क्षेत्रातील किमान ९९० तासांचे प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे आणि ते प्रशिक्षण भारतीय मान्यताप्राप्त संस्थेकडून घेतलेले असणे आवश्यक आहे. GDA (General Duty Assistant), Home Health Aide किंवा तत्सम कोर्स केलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

महिलांसाठी ८० टक्के आणि पुरुषांसाठी २० टक्के पदे राखीव आहेत. निवड प्रक्रिया इस्त्रायली नियोक्त्यांकडून केली जाणार असून भारत सरकार किंवा एनएसडीसी हे नियोक्ता म्हणून कार्य करणार नाहीत. एनएसडीसी केवळ सुविधा पुरवणारी संस्था म्हणून काम करेल. निवड झाल्यानंतर कामासाठी इस्त्रायलमध्ये जाताना कुटुंबियांना (पती, पत्नी किंवा मुले) सोबत नेण्याची परवानगी असणार नाही.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी अधिक माहितीसाठी आणि अर्ज प्रक्रियेसाठी https://maharashtrainternational.com/jobdetail.aspx किंवा या कार्यालयाशी प्रत्यक्ष अथवा दत्तात्रय कांबळे मो. क्र. ९०२८२३८४६५ संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी लवकरात लवकर अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा,

असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे मुरुड येथे आगमन



**लातूर/प्रतिनिधी :** अनेक वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे मुरुड येथे आगमन झाले असून या निमित्ताने पुतळ्याची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली प्रारंभी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. सदरील पुतळ्याचे लवकरच भव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकार्पण करण्यात येणार आहे.

लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पूर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी अनेक वर्षापासून मुरुडकरांनी प्रयत्न केले मोठ्या प्रतिक्षेनंतर लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून नाशिक येथील कारागरांनी तयार केलेला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अत्यंत आकर्षक आणि भव्य पूर्णकृती पुतळा नुकताच मुरुड नगरीत दाखल झाला. सदरील पुतळ्याची छत्रपती शिवाजी महाराज चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत वाजत गाजत फटाक्याची आतिषबाजी करत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात भव्य मिरवणूक काढण्यात आली. लवकरच भव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून या पुतळ्याचे लोकार्पण होणार आहे.

मिरवणुकीच्या प्रारंभी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बसविण्यात येणार्या पुतळ्याच्या जागेची त्यांनी पाहणी करुन सुचना केल्या. यावेळी पु. भिकू पय्यानंद, भाजपाचे किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, भाजपा मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील, मुरुडचे उपसरपंच वैभव सापसोड, भाजपाचे शहराध्यक्ष महेश कणसे, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, सतीश आंबेकर, विश्वास कावळे, दीपक वांगसकर, सौ. लताताई भोसले, सुरज सूर्यवंशी, नागराज बचाटे, शुभम देवकर, रवी इटकर, दत्ता पुदाले, वैजनाथ हराळे, रवी माकोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा कमिटीचे अध्यक्ष महेश सुरवसे, उपाध्यक्ष भालचंद्र धावारे, सचिव गौतम लांडगे, धनराज शिंदे, योगीराज साखरे, बाबा भिसे, शुभम खोसे यांच्यासह मुरुड येथील सर्व समाजातील नागरिक तरुण भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाणी टंचाईचे उग्र रूप

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात उन्हाचा पारा ४१ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले आहे. विहिरी, बोअरवेल आणि तलाव आटल्याने ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या वर्षी चांगला पाऊस होऊनही, यंदा मार्च महिन्याच्या अखेरीपासूनच टंचाईच्या झळा बसू लागल्या आहेत.

जिल्ह्यातील ५१ गावे आणि २० तांडे-वाड्यांवर पाणीटंचाई जाणवत असून, ग्रामपंचायतींनी विहीर अधिग्रहणाचे एकूण ८१ प्रस्ताव पंचायत समित्यांकडे सादर केले होते. तहसील कार्यालयांनी पाहणी करून त्यापैकी २५ गावे आणि ९ वाड्यांसाठी ३५ अधिग्रहणांना मंजुरी दिली आहे. विशेषतः जळकोट तालुक्यातील शिवाजी नगर तांडा, वाघमारी तांडा आणि गव्हाण येथे पाणीटंचाई तीव्र असल्याने दोन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. टँकर गावात येताच पाण्यासाठी ग्रामस्थांची मोठी धावपळ उडत असल्याचे चित्र आहे. डोंगराळ आणि दुर्गम भागात पाण्यासाठी नागरिकांना रानोमाळ भटकावे लागत आहे. सद्यःस्थितीत औसा, अहमदपूर आणि उदगीर तालुक्यांत सर्वाधिक अधिग्रहण प्रस्ताव आहेत. येत्या काळात उन्हाचा तडाखा वाढल्यास, टंचाईग्रस्त गावांची आणि टँकरची मागणी आणखी वाढण्याची दाट शक्यता आहे. जिल्ह्याच्या डोंगराळ आणि दुर्गम भागात पाण्याची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. अवकाळी पावसाची हजेरी असली तरी, पाण्याची उपलब्धता कमीच आहे. जिवंत पाणीसाठे आटल्याने महिला आणि नागरिकांना हंडाभर पाण्यासाठी रानोमाळ भटकावे लागत आहे. उन्हाचा पारा ४१ अंशांवर असल्याने टंचाई वाढली.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात TCS कॅम्पस ड्राईव्ह यशस्वी: ३०० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; करिअरच्या नव्या संधींना मिळाला वेग



**लातूर/प्रतिनिधी :**दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथे दयानंद एज्युकेशन सोसायटीतर्फे टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (ढउड) कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह मंगळवार, ५ मे २०२६ रोजी उत्साहात पार पडला. या उपक्रमात एकूण ३०० विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसाठी ॲप्टिट्यूड टेस्ट, एचआर राऊंड आणि वैयक्तिक मुलाखती अशा विविध टप्प्यांत निवड प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जे.एस. दरगड उपस्थित होते. कार्यक्रमास टीपीओ अनिल बिरादार, उपप्राचार्य डॉ.जी. आर. लहाने, आयक्यूएसी समन्वयक डॉ.बी. टी. चव्हाण, वाणिज्य विभागप्रमुख डॉ.एम. एस. आष्टेकर, बीसीए विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. स्वामी, बीबीए विभागप्रमुख डॉ.व्ही.बी. सातपुते तसेच प्लेसमेंट सेल प्रमुख प्रा.डी. जे. शेख यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या सत्काराने झाली. प्रास्ताविकात अनिल बिरादार यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. प्रमुख पाहुणे दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जे. एस. दरगड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत भविष्यातील संधींचा वेध घेतला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी विद्यार्थ्यांनी अशा संधींचा लाभ घेऊन आपले करिअर घडवावे, असे आवाहन केले. निवड प्रक्रियेदरम्यान आकांशा मोझर यांनी कंपनीविषयी सविस्तर माहिती दिली. ऋतुजा मोहिते, नेहा गरजे, योगेश पोतदार, सय्यद मोहसीन यांच्यासह एकूण ११ सदस्यांनी मुलाखत प्रक्रियेत सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती महावरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.जी. एम. जोशी यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.एस. पी. चिकटे, प्रा.जी.एम. जोशी, प्रा.जे. ए. महावरकर, प्रा.एन. वाघमारे, डॉ.के.डी. औसेकर, प्रा. प्रसाद पाटील तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष योगदान लाभले.

## रविवारी लातूरमध्ये दुसरे बौद्ध साहित्य संमेलन, उद्योजक रोहित पिसाळ यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** तथागत गौतम बुद्ध छत्रपती शिवाजी महाराज महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती आणि अर्थसत्ता न्यूज च्या वर्धापन दिनानिमित्त रविवार दिनांक १० मे २०२६ रोजी येथील भालचंद्र ब्लड बँक सभागृहातील प्रज्ञा सूर्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर साहित्य नगरीत दुसरे बौद्ध साहित्य संमेलन आयोजिले आहे. उद्घाटन दोन परिसंवाद कथाकथन कवी संमेलन आणि समारोप असा संमेलन कार्यक्रम आहे, ही माहिती स्वागताध्यक्ष चंद्रकांत शिंदे आणि संयोजक राजेंद्र कांबळे यांनी दिली.

सदरील बौद्ध साहित्य संमेलनाचे उद्घाटन सकाळी १०:३० वाजता उद्योजक रोहित पिसाळ यांच्या हस्ते बौद्ध धम्माचे गाढे अभ्यासक डॉक्टर प्रशांत गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री आमदार संजय बनसोडे उपस्थित राहणार आहेत . दुपारी १२:३० वाजता ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत डॉक्टर नारायण कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तथागत बुद्ध ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भारतीय बौद्ध साहित्यातील समाज परिवर्तनातील भूमिका या विषयावरील परिसंवाद होत असून यात जग बदलणारा बाप माणूस चे लेखक जगदीश ओहोळ हे प्रमुख वक्ते भाष्य करणार आहेत..

दुपारी दोन वाजता एवढी गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली तथागत बुद्धाची स्त्री विषयक भूमिका या विषयावरील परिसंवादात डॉक्टर गिरीश मोरे हे भाष्य करणार आहेत यावेळी एम एम बलांडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दुपारी तीन ३० वाजता ज्येष्ठ कथाकार जी जी कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कथाकथनात कळंबचे केवी सर्व दे आणि धाराशिव चे राजेश जगताप हे कथा सादर करतील. दुपारी ४:३० वाजता कवी संजय घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते यांच्या सूत्रसंचालनात कवी संमेलन होणार आहे. राजेंद्र कांबळे, प्रा.दर्शना देशमुख, रंजना गायकवाड, प्रफुल्ल धामणगावकर, डॉक्टर दुष्यंत कठारे , प्रा.पंढरी बनसोडे, शैलजा कारंडे, प्रा. क्रांती मोरे, मीना घुमे, गोविंद गारकर, रामदास कांबळे, उषा भोसले, दिलीप गायकवाड, पांडुरंग वाघमारे, प्रदीप कांबळे, सरोज गायकवाड, नयन राजमाने, तहेसीन सय्यद, नम्रता धडे, ऋचा पतकी, प्रा. सविता किर्ते छगन घोडके, शीला कुलकर्णी, रमेश हणमंते हे कवी आपल्या कविता सादर करणार आहेत. सायंकाळी सहा वाजता डॉक्टर प्रशांत गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या समारोप सत्रास महापौर जयश्रीताई सोनकांबळे आणि भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्ष आशाताई चिकटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याप्रसंगी कालाम सूत्त,: वर्तमान समाजाची गरज या विषयावर प्रा. बापू गायकवाड यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे. यावेळी अर्थसत्ता न्यूज चे संपादक राजेंद्र कांबळे हे ठरावांचे वाचन करणार आहेत.. तरी दिवसभर चालणाऱ्या या दुसऱ्या बौद्ध साहित्य संमेलनाचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत शिंदे, उपाध्यक्ष भगवान लोखंडे ,डी एस नर्सिंगे, सचिव यु डी गायकवाड, सहसचिव भगवान बनसोडे, जी जी कांबळे ,कोषाध्यक्ष एम एम बलांडे ,सह कोषाध्यक्ष पल्लवी घोबाळे ,सह कोषाध्यकक्ष मंगल ताई कांबळे ,निमंत्रक एडवोकेट धम्मदीप बलांडे ,शांतरक्षित सुरवसे ,प्राध्यापक डॉक्टर लहू वाघमारे ,रवींद्र राजेगावकर, डॉक्टर शिवाजीराव गाडे ,देवदत्त बनसोडे ,मारुती सरवदे डॉक्टर प्रशांत मुगळे प्राध्यापक डॉक्टर निखिल राजवर्धन, अशोक बनसोडे, अलका गायकवाड ,राजेंद्र बनसोडे, नितीन गायकवाड इत्यादींनी केले आहे

## विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय स्पर्धेत कबड्डी, खो-खो मध्ये महावितरण, राजस्थानची आगेकूच




पुणे/प्रतिनिधी एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४५ व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत बुधवारी (दि.६) झालेल्या चुरशीच्या साखळी सामन्यांमध्ये महावितरणच्या पुरुष व महिला संघाने प्रतिस्पर्धी संघावर सहज विजय मिळवला. तर खो-खोमध्ये महावितरणच्या पुरुष संघासह राजस्थानच्या महिला व पुरूष संघाने आगेकूच केली आहे.

बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात आज पहिल्या सत्रात कबड्डी, खो-खोचे साखळी सामने झाले. कबड्डीच्या सामन्यांमध्ये महापारेषण संघाने मध्यप्रदेशच्या एमपी पॉवर संघाचा ३ गुणांनी पराभव केला. तर महावितरणने एकतर्फी वर्चस्व गाजवत महानिर्मिती संघाचा २६ गुणांनी पराभव केला. पंजाब पॉवरने उत्तराखंडच्या पॉवर ट्रान्समिशन कंपनीचा १७ गुणांनी आणि हरियाणा संघाने गुजरात संघाचा ३० गुणांनी पराभव केला. कबड्डीच्या महिला गटात हिमाचल प्रदेशने महापारेषण संघाचा ३२ गुणांनी तर महावितरणने हरियाणा पॉवर संघाचा ४८ गुणांनी एकतर्फी पराभव केला.

खो खोच्या महिला गटात राजस्थान संघाने गुजरात ऊर्जा विकास निगम संघाचा पराभव केला. तर पुरुष गटात हरियाणा पॉवर संघाने मध्यप्रदेश पॉवर संघाचा, राजस्थान विद्युत निगम संघाने गुजरात ऊर्जा विकास निगमचा तर राष्ट्रीय खो खो संघाचा कर्णधार व महावितरणचा खेळाडू प्रतिक वाईकर याच्या नेतृत्वात महावितरणने हिमाचल प्रदेश राज्य विद्युत मंडळ संघाचा सहज पराभव केला.

## भिसेवाघोली येथील भिसे कुटुंबीयाचे आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून सांत्वन



**लातूर/प्रतिनिधी :**लातूर तालुक्यातील मौजे भिसेवाघोली येथील कै. मगणराव भिसे पाटील आणि कै. बन्सी गोविंद भिसे यांचे नुकतेच निधन झाले. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी या दोन्ही भिसे परिवाराची भेट घेवून सांत्वन केले. कै. मगणराव भिसे पाटील आणि कै. बन्सी गोविंद भिसे यांचे वृद्धापकाळाने नुकतेच दुःखद निधन झाले.

सदरील दोन्ही भिसे कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी मंगळवारी भिसेवाघोली त्यांच्या निवासस्थानी जाऊन दिवंगत मगणराव भिसे पाटील आणि दिवंगत बन्सी भिसे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी आ. रमेशअप्पा कराड यांनी राजाभाऊ मगनराव भिसे, आप्पासाहेब मदनराव भिसे, दीपक मगनराव भिसे आणि विकास बन्सी भिसे, दीपक बन्सी भिसे या दोन्ही कुटुंबातील सदस्यांशी चर्चा करून सांत्वन केले. यावेळी आ. कराड यांच्या समवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंके, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवतराव सोट, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, दिपक वांगसकर, पद्माकर चिंचोलकर, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, विश्वास कावळे, सतिश अंबेकर, ॲड. धनराज शिंदे, योगीराज साखरे, बाबासाहेब भिसे, अंकुश गणगे, शुभम खोसे यांच्यासह भिसेवाघोली येथील इतर अनेक जण होते.

## एमएचटी-सीईटी २०२६ परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र बी. प्लॅनिंग व कृषी तंत्रज्ञान या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एमएचटी-सीईटी २०२६ (एमबीए, पीसीबी व पीसीएम) ही परीक्षा एमबीए ग्रुपकरिता ९ मे, २०२६ रोजी ऑनलाईन पध्दतीने लातूर जिल्ह्यातील २ परीक्षा केंद्रावर, तसेच पीसीएम ग्रुपकरिता १२ ते २० मे, २०२६ ( दि. १६,१७ व १८ मे , २०२६ वगळून) या कालावधीत लातूर जिल्ह्यातील एकूण १४ परीक्षा केंद्रावर दोन सत्रामध्ये आयोजित केलेली आहे.

या परीक्षा कालावधीमध्ये परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी परीक्षा केंद्राच्या परिसरामध्ये भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्रतिबंधात्मक आदेश जिल्हादंडाधिकारी राहूल कुमार मीना यांनी लागू केले आहेत.

त्यामुळे परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परिक्षार्थी व्यतिरिक्त पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षार्थी अथवा अन्य व्यक्तींकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यात येणार नाही.

१०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्रांच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तीकडून परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करण्यात येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस, वाहनास प्रवेश मनाई राहील.

हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत त्यांच्या परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाहीत. हे आदेश ९ ते २० मे, २०२६ (दि. १६,१७ व १८ मे, २०२६ वगळून) या कालावधीत सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहतील.

# ग्रामपंचायतीतील गैरव्यवहारांवर सरकारचा कडक बडगा - सरपंच ते कर्मचाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये वाढत चाललेल्या गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी शासनाने अत्यंत कठोर निर्णय घेतला असून, आता ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार करणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. या आदेशामुळे ग्रामीण प्रशासनात खळबळ उडाली असून अनेक पदाधिकारी धास्तावले आहेत.

काय सांगते शासनाची नवी भूमिका?

शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार खालील प्रकारच्या गैरप्रकारांवर कठोर कारवाई होणार आहे:

ग्रामपंचायतीच्या निधीचा अपहार किंवा गैरवापर, बनावट कागदपत्रे तयार करणे किंवा फेरफार करणे, विकासकामांमध्ये अनियमितता आणि भ्रष्टाचार, शासनाच्या योजनांमध्ये लाभार्थी निवडीत गैरप्रकार, या सर्व प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक व इतर कर्मचाऱ्यांवर थेट गुन्हा नोंदवला जाणार आहे.

**चौकशीसाठी कडक टाइमलाइन**

शासनाने चौकशी प्रक्रियेलाही वेळेची मर्यादा घातली आहे: तक्रार प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करणे बंधनकारक चौकशीत दोष सिद्ध झाल्यास त्वरित एफआयआर दाखल कारवाई टाळणाऱ्या किंवा विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही शिस्तभंगाची कारवाई

**कोणालाही सूट नाही!**

या आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, पद मोठे असो किंवा लहान कोणालाही सूट दिली जाणार नाही.

यामुळे अनेक वर्षांपासून चालत आलेल्या सेटिंग आणि दडपशाहीच्या पद्धतींना मोठा धक्का बसणार आहे.

प्रशासन तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय ऐतिहासिक असून: ग्रामीण स्तरावर पारदर्शकता वाढेल. भ्रष्टाचारावर आळा बसेल,जबाबदारीची जाणीव वाढेल मात्र, राजकीय हस्तक्षेप टाळून अंमलबजावणी झाली तरच हा निर्णय प्रभावी ठरेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# बदलत्या जीवनशैलीचे दाहक वास्तव मांडणारे 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय'



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-आधुनिक जीवनशैलीच्या झगमगाटात आजची 'विवाह संस्था' एका नव्या वळणावर उभी आहे. जोडीदाराकडून असलेल्या अवास्तव अपेक्षा, त्यातून होणारा अपेक्षाभंग आणि त्यातूनच मानवी नात्यांना फाटा देऊन 'तांत्रिक पर्यायांकडे' झुकणारी मानवी मानसिकता, याचे जळजळीत चित्रण 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय' या नाटकाने धाराशिवकरांसमोर मांडले. माणूस हा कधीही 'परफेक्ट' किंवा परिपूर्ण असूच शकत नाही, उलट त्याचा अट्टाहास धरणे हे मानवी भावनेचे किती केविलवाणे प्रदर्शन आहे, याचा प्रत्यय देत या नाटकाने मानवी स्वभावाचे अनेक पदर रसिक प्रेक्षकांसमोर उलगडले आणि त्यांना अंतर्मुख होण्यास भाग पाडले. 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय' या गाजलेल्या मराठी नाटकास धाराशिवमध्ये नाट्य रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा धाराशिव यांच्या वतीने मंगळवार, ५ मे रोजी रात्री ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे या नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. या नाटकाचे उदघाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कार्यकारिणी सदस्य मुंबई विशाल शिंगाडे,नगरसेविका अर्चना विशाल शिंगाडे,डॉ. अभय शहापूरकर, राजेंद्र अत्रे, शेषनाथ वाघ, डी. जी. कुलकर्णी, सुगत सोनवणे, शशी माने, यांच्या हस्ते झाले.

'जिगीशा' निर्मित आणि चंद्रकांत कुलकर्णी प्रस्तुत या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन विनोद रत्ना यांनी केले आहे. वैभव रंधवे, समृद्धी कुलकर्णी आणि श्रेयस जोशी यांनी प्रभावी अभिनय साकारत प्रेक्षकांची मने जिंकली. नेपथ्याची जबाबदारी ऋतुजा बोठे यांनी सांभाळली, तर प्रकाशयोजनेचे काम अभिप्राय कामठे यांनी पाहिले.नाटक यशस्वीतेसाठी विजय उंबरे,सुहास झेंडे,श्वेत चिलवंत, सारीपुत शिंगाडे, बापू माने, बापू साबळे यांनी परिश्रम घेतले.संपूर्ण नाटका दरम्यान प्रेक्षकांनी दिलेल्या टाळ्यांचा कडकडाट आणि प्रतिसाद उत्स्फूर्त मिळाला.

# अवकाळीच्या भीतीने कांदा काढणीची शेतकऱ्यांची घाई



गणेगाव(प्रतिनिधी)-सततचे ढगाळ वातावरण, गारपीट व अवकाळी पाऊस यामुळे होणारे सभाव्य नुकसान टाळण्यासाठी रब्बी हंगामात लागवड केलेल्या काद्याच्या काढणीची घाई गणेगाव परिसरात सुरू झाली असून, मजूर टंचाई मुळे एका एकरातील कांदा सोळा हजार रुपये खर्च करावा लागत आहे. काही दिवसापासून वाढलेले ऊन आणि पडलेला अवकाळी पाऊस यांमुळे कांद्याचे पिक लवकर काढण्यासाठी आले आहे. या वर्षी वातावरणातील बदलामुळे काद्याची पात वेळेच्या आगोदर वाळली आहे. त्यामुळे ऑक्टोबर व नोव्हेंबर महिण्यात ज्या शेतकऱ्यांनी कांदा लागवड केली होती. ती काढणीस आली असून, सततचा अवकाळी पाऊस, गारपीट व ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यापुढील अडचणीत वाढ झाली आहे. परिणामी पावसामुळे नुकसान होऊ नये, यासाठी कांदा करण्याची घाई करावी लागत आहे. शिवाय सध्या बाजारात कांद्याला दहा-अकरा रुपये भाव मिळत आहे. उन्हाचा पारा वाढल्याने मजूर सकाळच्या व संध्याकाळच्या वेळीच कांदा काढणीची कामे करत असून, काही शेतकरी कांद्याचे दर घसरण्याच्या भीतीने काढलेला कांदा हा अवकाळी पाऊस येतोय का या भीतीने कांदा बार्शी सोलापूर बाजारपेठेला पाठवत आहेत सध्या सरासरी १००० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत आहे.

# वन्यजीव संकटात; पाणवठे नादुरुस्त, वन विभागाचे दुर्लक्ष



धाराशिव (शेख अंजुम)- कळंब तालुक्यातील उपळाई व शेलगाव दिवाणी परिसरातील वन विभागाच्या तब्बल १०९ हेक्टर क्षेत्रात सध्या भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तापमानामुळे जंगलातील जलस्रोत आटत असताना, वन विभागाच्या निष्काळजी कारभारामुळे वन्यजीवांवर गंभीर संकट ओढवले आहे.

उपळाई येथे सुमारे ६० हेक्टर तर शेलगाव दिवाणी येथे ४९ हेक्टर असे मिळून १०९ हेक्टर क्षेत्रात पाणवठे पूर्णपणे नादुरुस्त अवस्थेत आहेत. शासनाकडून या पाणवठ्यांसाठी दरवर्षी लाखो रुपये खर्च केले जात असतानाही त्यांची दुरुस्ती न झाल्याने वन्य प्राणी पाण्याअभावी त्रस्त झाले आहेत.

या परिसरात मोर, माकड, ससे, हरिण यांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. मात्र पाण्याची सोय नसल्याने हे प्राणी गावाकडे व रस्त्यांकडे वळत असून त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे जवळून जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगर-सोलापूर महामार्गावर अनेक वेळा वन्य प्राण्यांचे अपघाती मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

उपळाई येथील गट क्रमांक ६४४ मध्ये सुमारे ५० आर क्षेत्रात पावसाळ्यासाठी ५० हजार रोपे तयार करण्यात आली होती. मात्र पाण्याअभावी ही सर्व रोपे जळून खाक झाली. शासन दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करून वृक्षलागवडीचे नियोजन करत असले तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र येथे पाहायला मिळत आहे. मलकापूर येथील वन्यजीवप्रेमी सुंदर लोमटे यांनी सांगितले की, गेल्या तीन वर्षांपासून पाणवठे नादुरुस्त असून त्याकडे वन विभाग पूर्णतः दुर्लक्ष करत आहे.


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


# कोथिंबीरच्या अडीच एकरात ३५ दिवसांत शेतकऱ्याला मिळाले ६.७१ लाख!

धाराशिव : धाराशिव तालुक्यातील खेड येथील शेतकरी विनोद भागवत टिकले यांना अडीच एकरांतील कोथिंबीर पिकाने ६ लाख ७१ हजार रूपये दिले. यासाठी त्यांना लागवडीपासून काढणीपर्यंत ४५ हजारांचा खर्च आला. खर्च वजा जाता त्यांना निव्वळ ६ लाख २६ हजारांचा नफा झाला. शेतकरी उन्हाळ्यात कमी कालावधीत निघणा-या कोथिंबिरीचे पीक घेतो. अनेकदा भाव पडतात, तेव्हा खर्च पाण्यात जातो. परंतु जेव्हा चांगला दर मिळतो, तेव्हा शेतक-याला लॉटरी लागते. धाराशिव तालुक्यातील या शेतक-याला एका अर्थाने लॉटरीच लागली आहे.

कोथिंबीर हे अवघ्या ३५ दिवसांत काढणीला येणारे पीक एकरी १८ ते २० हजारांचा खर्च चांगला भाव मिळाला तर तो शेतकरी लखपती झालाच म्हणून समजा. त्यामुळे अलिकडच्या पाच-सहा वर्षांत धाराशिव जिल्ह्यातील अनेक शेतकरी कोथिंबीर या मसालावर्गीय पिकाकडे वळले आहेत. कोथिंबिरीची लागवड, पाणी देण्याची पद्धत यामध्ये आधुनिकता आल्याने व उत्पादन मोठ्या प्रमाणात निघत असल्याने हे पीक शेतक-यांना आर्थिकदृष्ट्या परवडत आहे. कोथिंबीर खरेदी करणारे व्यापारी थेट बांधावर येऊन खरेदी करतात. या पिकाची काढणी व्यापारी स्वत: मजूर आणून करतात. तसेच बांधावर ठरलेले पैसे शेतक-यांना देतात. त्यामुळे अनेक शेतकरी अन्य पारंपरिक पिकांना फाटा देत कोथिबींर पिकाला प्राधान्य देत आहेत.

खेडचे शेतकरी विनोद भागवत टिकले यांनी दि. १८ मार्च २०२६ रोजी अडीच एकरात कोथिबिरीची (धने) पेरणी केली. आवश्यक असणारे खत पेरतानाच दिले. रेन पाईप व मिनी स्प्रींक्लरच्या सहाय्याने पिकाला पाणी दिले. धने उगवल्यानंतर खुरपणी केली. दोन फवारणी केल्या. यासाठी त्यांना ४५ हजार रुपये खर्च आला. ३५ दिवसांनंतर पीक काढणीला आल्यानंतर पळसवाडी (ता. धाराशिव) येथील व्यापारी अप्पा शिंदे यांनी थेट बांधावर येऊन अडीच एकरांतील कोथिंबिरीचा फड ६ लाख ७१ हजार रुपयांना खरेदी केला. खर्च वजा जाता विनोद टिकले यांना अडीच एकरांतून ६ लाख २६ हजारांचा नफा झाला.

खेड येथील शेतकरी विनोद भागवत टिकले हे प्रयोगशील शेतकरी म्हणून परिचित आहेत. यंदा विनोद टिकले यांनी चारवेळा एकरभर कोथिंबिरीची पेरणी केली. त्यांना तीनवेळा बरा दर मिळाला. यातून त्यांना सव्वातीन लाख रूपये मिळाले. उन्हाळी हंगाम असल्याने चौथ्यावेळी त्यांना चांगला दर मिळाल्याने अडीच एकरातून ६ लाख ७१ हजार रुपये मिळाले. कोथिंबीर पिकाने त्यांचा कायापालट केला असल्याचे विनोद टिकले यांनी सांगितले.

गेल्या पाच-सहा वर्षापासून धाराशिव जिल्ह्यात कोथिंबीर पिकाची लागवड वाढली. कोथिंबीर खरेदी करणारे व्यापारी ही गावोगावी तयार झाले आहेत. हे व्यापारी मुंबई, पुणे, नागपूर, बेंगलोर यासारख्या मोठ्या महानगरात कोथिंबीर पाठवितात. त्यांच्याकडे काढणीसाठी मजुरांची यंत्रणा आहे. कोथिंबीर हे नाजूक पीक असल्याने वेळेत काढणी व बाजारपेठेत वेळत दाखल होणे गरजेचे असते. ज्या शेतक-यांना कोथिंबीर पिकाचे गणित समजले ते शेतकरी नेहमी हे पीक घेऊन आर्थिक समृद्ध झाले आहेत. परिणामी अनेक गावेही समृद्ध झाली आहेत.

# मर्यादित इंधन साठ्यामुळे वाहनांच्या रात्रीच्यावेळी रांगा

वाशी (प्रतिनिधी)- मागील आठ दिवसापासून तालुक्यातील पेट्रोल पंपावर इंधन मर्यादित स्वरूपात उपलब्ध असल्याने छोट्या व्यवसायासह शेतीला याचा फटका बसत आहे. तालुक्यात ३० किमी राष्ट्रीय महामार्ग जवळपास ६० हजार हेक्टर वाहितेचे क्षेत्र आहे. शेकडो वाहनांवर आणि त्यांच्या वाहतुकीवर आधारित छोटे मोठे व्यवसाय आणि त्यातून हजारो युवकांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागतो. अवघ्या काही दिवसांवर खरीप येऊन ठेपला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना खरीपूर्व मशागत करण्यातही नांगरणी करणे गरजेचे आहे. तालुक्यात नांगरणी ही ट्रॅक्टरचा सहाय्याने करण्यात येते. नुकतीच रब्बीचे ज्वारी, कांदा काढणी झाली आहे काही ठिकाणी सुरू आहे. तर हरभरा,गहू याची काढणी झाल्याने शेती मोकळे होऊन नांगरून पडले आहे. त्याची पुढची कामे करायची आहेत. ती करण्यासाठी ट्रॅक्टर आवश्यक आहे मात्र, ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलचा तुटवडा तालुक्यातील पंपावर आल्याने चिंता वाढली आहे. डिझेल भरण्यासाठी गेल्यावर ज्या ठिकाणी उपलब्ध आहे, त्या ठिकाणी १ हजार ते जास्तीत जास्त ३ हजार रुपयांचे म्हणजे अधिकाधिक ३० लिटर मिळत आहे. त्यासाठीही तालुक्यातील १३ पंपापैकी ज्या ठिकाणी उपलब्ध आहे, तिथे आपले वाहन घेऊन जाऊनच भरणे आवश्यक आल्याचा अलिखित नियम सध्या राबवण्यात येत आहे. तर तालुक्यात मोठी बाजारपेठ नसल्याने येथील भुसार व्यावसायिक,पेंड विक्री करणारे व्यावसायिक यांची वाहनाकडून होणारी पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. ट्रॅक्टरसाठी ३० लिटर डिझेल घेण्यासाठी जाताना १० लिटर खर्च करावे लागत असल्याने अडचण ट्रॅक्टरसारख्या मोठ्या वाहनाना १ किमी जाण्यासाठी किमान ३ ते ४ लिटर डिझेल लागत असल्याने पंपावर मिळणाऱ्या ३० लिटरसाठी १० लिटर हेलपाट्यात जाऊन आर्थिक फटका बसत आहे. याचा थेट परिणाम मशागतीच्या कामाच्या दरांवर होऊन शेतकऱ्याला आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्याबरोबर ट्रॅक्टर सारखे वाहन कर्ज काढून घेतल्याने त्याचे हप्ते भरण्यासाठी एवढाच मशागतीचा सिझन हातून जाऊन अर्थार्जन कमी झाल्याने वाहनधारक देखील अडचणीत सापडला आहे.

# सार्वजनिक ठिकाणी निष्काळजीपने अग्नीप्रज्वलीत करणाऱ्यावर गुन्हा दाखल

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत ओमकार रा. शंगर नगर मुरुड ता. जि. लातुर, गोरख रा. शिवाजी नगर मुरुड ता. जि. लातुर यांनी लासोना जाणारे रोडलगत जामा मस्जीद शेजारी आपल्या हातगाड्या वरील गॅस शेगडी वर निष्काळजीपने अग्नीप्रज्वलीत करुन भा.न्या.सं. कलम- २८७ चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकार तर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरुध्द बेंबळी पो. ठा.येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649